हागीर गांवांत चालविण्यासाठीं मिळाले होते त्याचप्रमाणें ते येवलें येथेंही चालविण्यास्तव मिळावे ह्मणून रघुनाथराव यानीं याच सुमारास मुंबई सरकारास विनंती केली. त्यावरून ते दोन्ही अधिकार त्यांस द्यावे आणि त्यांचे येवलें येथील वाड्यांत मामलेदार कचेरी आहे ती काढून तो वाडा त्यांचे ताब्यांत द्यावा असा सरकारचा ठराव झाला. त्या बरहुकूम रघुनाथराव यांस माजिस्ट्रेटचा अधिकार मिळून कचेरीचा वाडाही त्यांचे हवालीं करण्यांत आला; परंतु दिवाणी अधिकार देण्यास कायद्याची कांहीं हरकत आल्यावरून तो मिळणें तसेंच राहिलें. मिळालेला माजिस्ट्रेटचा अधिकार चालू करण्यास्तव रघुनाथराव नरसिंगपुराहून विंचुरास परत आले. माधवराव यांची कायदे कौन्सिलांतील दुसऱ्या नेमणुकीची मुद्दत संपून तेही त्यावेळेस विंचुरास आले. कृष्णराव बापूसाहेब हे विंचूरासच होते. नंतर त्रिवर्ग बंधू येवल्यास गेले. तेव्हां तेथील राहणारे लोक व म्युनिसिपालिटीचे कमिशनर यांनीं रघुनाथराव यांचा मोठ्या समारंभानें सत्कार केला. रघुनाथराव यानीं माधवराव यांस येवलें येथील माजिस्ट्रेटच्या कामाची सोंप करून ते विंचुरास परत आले आणि विंचूर येथील कारभार त्यांचे दुसरे बंधु कृष्णराव हे पाहातच होते सबब ते नरसिंगपुरास परत गेले.

याच सालीं सेप्टेंबर महिन्यांत दादासाहेब यांची पत्नी प्रसूत होऊन तिला कन्या झाली. पुढें त्या बाईची प्रकृति वायूनें बिघडून तिला एकाएकीं देवआज्ञा झाली. तिचे मागें तिची तान्ही कन्या तान्हुबाई राहिली. तिचें दादासाहेब यांनीं संगोपन करून ती दाहा वर्षांची झाल्यावर म्हणजे सन १८७४ सालीं त्यानीं तिचें लग्न चांदुरीकर जाहागीरदार हिंगणे यांचे पुत्राबरोबर करून दिलें.

वर लिहिल्याप्रमाणें दादासाहेब यांचें पहिलें कुटुंब निवर्तल्यावर अजमासें एक वर्षानें त्यांनीं मुंबई येथें आपलें दुसरें लग्न केलें. ही वधू बडोदें येथील माजी दिवाण गोविंदराव रोडे यांचे पदरचे

तात्यासाहेब देशपांडे शिरापूरकर यांची कन्या होती. त्या बाईचें नांव दादासाहेब यांनीं सरस्वतीबाई असें ठेविलें.

या लग्नाचे संबंधानें दादासाहेब यानीं मुंबई येथें गिरगांवांत आंग्र्याचे वाडींत एक मोठा सुशोभित मंडप घालविला आणि त्यांत उत्तम प्रकारची रोषनी करवून येथें मुंबईचे गव्हरनर सर हेन्री बार्टल् फ्रीअर यांस एके रात्रीं जाफत दिली. त्या जाफतीस मोठे दर्ज्याचे पुष्कळ दरबारी व लष्करी साहेब यांस ही बोलावणीं झालीं होतीं. सर्व साहेबलोकांनीं खाना खाल्यावर त्यांजपुढें पुष्कळ प्रकारची आतषबाजी (दारुकाम) सोडण्यांत आली. नंतर हिंदुनाटककाराचें नाटकही करविण्यांत आलें. शिवाय, बडोद्याहून तेथें कसरतीचा खेळ आला होता तोही त्यांजपुढें करून दाखविण्यांत आला. या जाफती करितां दादासाहेब यांचे विशेष बोलावण्यारून रघुनाथराव हे मुंबईस जाऊन त्या जाफतीचे प्रसंगी साहेबलोक वगैरेंच्या सत्काराकरितां त्या मंडपांत हाजिर होते.

वर लिहिल्याप्रमाणें रघुनाथराव हे सन १८६५ इ० सालीं दक्षिण व कर्नाटक यांतील कांहीं यात्रा करून विंचुरास परत आल्यावर त्यांचे कनिष्ट बंधु बापुसाहेब यांची रजा भरली सबब त्यानीं त्यांजकडून आणखीं एक वर्षाची रजा मिळण्यासाठीं आपले वरिष्ट अधिकाऱ्यांस अर्ज करविला. तो अर्ज मंजूर होऊन रजा मिळाल्या नंतर रघुनाथराव आपले कुलस्वामीची सेवा करण्यास्तव नरसिंगपूरास परत गेले.

माधवराव दादासाहेब विंचूरकर यांस सरकारानें सन १८६३ इ० सालीं वतन कामिशनाचे एक मेम्बर नेमिल्याबद्दल वर मजकूर लिहिलाच आहे. तें काम त्यानीं उत्तम प्रकारें बजाविल्यावरून सरकारानें विलायत सरकारचे मंजुरीनें सन १८६५ चे एप्रील महिन्यांत त्यांचे नांव दक्षिणेंतील पहिल्या प्रतीचे बडे लोकांत घातलें.

याच सुमारास इंग्लंडांतील जानसन नांवाचे प्रख्यात चितारी साहेब मुंबईस येऊन तेथून पुण्यास गेले. त्यांचे अंगीं पाहिजे त्या मनुष्याची व पदार्थाची हुबेहुब तसबीर काढण्याचा गुण आहे असा त्यांचा लौकीक ऐकल्यावर रघुनाथराव यांचे मनांत आलें कीं, सर बार्टल फ्रीअर साहेब गव्हरनर हे हिंदुस्थानांत बहुत वर्षे पर्यंत काम करीत राहिले असून ते बहुतेक नेटिव संस्थानिकांशीं दोस्तीनें वागले आहेत; शिवाय त्यांनीं आपले अधिकारांत करितां आले तितके उपकार बहुत लोकांवर केले आहेत; आणि जोंवर ते गव्हनरचे हुद्यार राहातील तोंवर ते प्रायः अणखींही लोकांचीं कल्याणें करितील; याकरितां वर लिहिलेल्या चिताऱ्याकडून त्यांची तसबीर काढवून ती प्रसिद्ध दरबारांत त्यांस नजर करावी, ह्मणजे पुढें ते आपले विलायतेस परत गेल्यावर त्यांस दक्षिणेंतील बडे लोकांचें वारंवार स्मरण होण्यास तें एक साधनच होईल. त्यावरून रघुनाथराव यांनीं दक्षिण व दक्षिणमाहाराष्ट्रदेश यांतील बहुतेक जाहागिरदारांस पत्रें लिहून त्यांत गव्हरनर साहेबांची तसबीर काढवून ती त्यांस दरबारांत मोठ्या समारंभानें सर्वांनीं मिळून नजर करण्याचा माझा विचार आहे या करितां त्या कृत्यास लागणाऱ्या खर्चांत भागीदार होऊन यथाशक्ति वर्गणी देण्याची इच्छा असेल तर तसें लिहून कळवावें म्हणून सूचना केली. सदर्हू जाहागिरदारांकडून अनुकुलतेचे जबाब आल्यावर रघुनाथराव यानीं नेकनामदार फ्रीअर साहेब यांस विनंतीपत्र लिहून त्यांत असें कळविलें कीं, "आंसाहेबांची तसबीर काढवून ती आपल्यास उघड दरबारांत नजर करावी असा माझा व दक्षिणेंतील बहुतेक सरदार लोकांचा हेतू आहे याकरितां या बाबदींत आपली मर्जी काय आहे ती मेहेरबानगीनें कळवावी." सदर्हू पत्राचे जबाबांत साहेब मौसूफ यांनीं ती तसबीर स्वीकारण्याविषयीं आपली खुषी दर्शीत केली. मग रघुनाथराव यानीं त्या कामीं आपले कनिष्ट बंधू कृष्णराव

यांची योजना केली. तेव्हां कृष्णराव यानीं दक्षिण व दक्षिण महाराष्ट्रदेश यांतील सरदारांकडून आलेल्या वर्गण्या एकत्र करून फंड जमा केला आणि ती तसबीर काढण्याबद्दल जॉन्सन साहेबांचे मेहेनतान्याचा * ठराव करून त्यांजकडून ती काढण्याची सुरवात करविली. चितारी साहेब यानीं थोडकेच दिवसांत ती तयार झाली म्हणून रघुनाथराव यांस लिहून कळविलें. मग रघुनाथ-राव यानीं नेकनामदार फ्रिअर साहेब यांची भेट घेऊन तसबीर तयार झाल्याचा मजकूर त्यांस समक्ष कळविला. पुढें थोडकेच दिवसांनीं ते साहेब सदहू तसबीर पाहाण्यास्तव रघुनाथराव यांस बरोबर घेऊन जॉन्सन साहेबांचे बंगल्यावर गेले आणि ती पाहि-ल्यावर त्यांस मोठी खुषी झाली.

सन १८६६ चे अखेरीस अक्कलकोटचे राजे मुंबईसरकारचे मतें मनानें व शरिरानें अशक्त ठरले, सबब त्यांचा राज्यकारभार चालविण्यास्तव सरकारानें सन मजकूरचे जून महिन्यांत रघुनाथ-राव यांचे कनिष्ट बंधु माधवरावदादासाहेब यांस " रिजेंट " (राज्यकारभार चालविणारे] या हुद्यावर नेमिलें. तेव्हां दादा-साहेब हे येवलें येथील माजिस्ट्रेटच्या कामाचा चार्ज आपले वडील बंधू कृष्णराव यांस देउन आपले नवीन हुद्याचा चार्ज घेण्यास्तव अक्कलकोटास गेले.

पुढें नेकनामदार फ्रीअरसाहेब गव्हरनर यानीं ता० २९ आक्टो-बर सन १८६६ इ० रोजीं दिवसास बारावर चार वाजतां पुणें येथें बडा दरबार केला. या दरबारास येण्याविषयीं दक्षिण व दक्षिण महाराष्ट्र देशांतील राजे व संस्थानिक व सरदार यांस स-रकारचीं पत्रें गेलीं. त्यावरून त्या दरबारास बडे लोक आले ते येणें प्रमाणेः—

---

* तसबीर काढण्या बद्दलचे फीचा.

१ कोल्हापुरचे माहाराज आपले प्रतिनिधि विशाळगडकर, बावडेकर, अमात्य, वगैरे अष्ट प्रधानांसुद्धां.

२ साताराचे प्रतिनिधि औंधकर.

३ भोरचे सचीव.

४ अक्कलकोटचे राजे रिजेंट माधवराव विठ्ठल विंचूरकर यां सुद्धां.

५ रतनसिंग जाधवराव राजे मालेगांवकर.

६ जवारजे राजे.

७ रामदुर्गकर भावे.

८ मुधोळकर घोरपडे.

९ विंचूरचे चीफ अंणा साहेब व त्यांचे बंधु कृष्णराव बापूसाहेब.

१० पटवर्धन संस्थानिक

१ सांगलीकर.
२ मिरजकर.
३ कुरुंदवाडकर.
४ जमखिंडीकर.

———

४

११ फलटण येथील निंबाळकर.

१२ जतकर डफळे.

१३ दक्षिण व दक्षिण माहाराष्ट्र देश यांतील इतर संस्थानिक.

१४ मुंबई येथील सर खर्सेदजी जीजीभाय बाटलीवाले बारोनेट.

१५ डेव्हिड् सासून यांचे जेष्ट चिरंजीव.

१६ पुण्यांतील पुरंदरे वगैरे बडे लोक.

१७ स्टार ऑफ इंडियाचे खिताबवाले सरदार.

१८ कायदे कौन्सिलचे मेम्बर साहेब लोक व नेटिव.

१९ मुंबईतील मोठे अब्रुदार सानसावकार व सौदागर.

२० पुण्यांतील दरोबस्त नेटिव हुद्देदार.

२१ या शिवाय मोठे दरजाचे दरबारी व लष्करी हुद्देदार साहेबलोक व अजमासें २०० मडमा.

२२ सुरत येथील एक आरब जातीचे मु सलमान सरदार.

या दरबारा करितां पुण्यांतील रेल्वे स्टेशनाचे पूर्वेस विक्टोरिया गार्डन नांवाचे बागेचे दक्षिण बाजूस ज्या ठिकाणीं हाल्लीं कौन्सिल हालचा बंगला आहे त्या ठिकाणालगत तंबू दिले होते

आणि त्यांत गव्हरनरसाहेबांकरितां एक मोठें तख्त ठेविलेलें असून इतर बडेसाहेबलोक व मडमा व सरदार लोक यांकरितां कोचें व खुर्च्या ठेविलेल्या होत्या.

नेकनामदार गव्हरनरसाहेब बॉडीगार्डांचे स्वारांनिशीं किती एक मोठमोठाले दरबारी व लष्करी साहेबलोक बरोबर घेऊन वर लिहिलेले दरबारचे तंबूस आले. तेथें शिरस्तेप्रमाणें सलामीच्या तोफा झाल्या. गव्हरनरसाहेबांस ताजिम देण्यास्तव कोल्हापुरचे माहाराज, सर्व संस्थानिक व सरदार आपआपल्या ठिकाणीं उभे राहिले. गव्हरनर साहेब तख्तावर बसल्यावर त्यांनीं कोल्हापुरचे माहाराज यांस जवळ बोलावून आपल्या लगत बसविलें; आणि त्यांस मुखत्यारी दिल्याबद्दल वस्त्रें व अलंकार आणि तरवार देऊन त्यांजबरोबर आलेले प्रतिनिधि व अष्टप्रधान यांस पोषाग दिले. नंतर माहाराजांनीं उभें राहून थोडा वेळपर्यंत इंग्रजींत आभारदर्शक संभाषण केलें, तेणेंकरून गव्हरनर साहेब यांस मोठी खुषी झाली. मग त्यांनीं जवार येथील राजांचे दत्तपुत्र यांस जवारचे गादीचे मालिक असें कबूल करून वस्त्रें व तलवार दिली. राजे यांनीं त्याबद्दल सरकारचे आभार मानिले. नंतर गव्हरनरसाहेब यांनीं रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अंणासाहेब विंचूरकर, सुरत येथील मुसलमान सरदार आणि मुंबईतील सौदागर डेविड सासून यांचे वडील चिरंजीव यांस कंपानियन ऑफ् धि मोस्ट एक्झाल्टेड ऑर्डर ऑफ् धि स्टार ऑफ इन्डिया असा खिताब व त्यासंबंधानें सोनें जडावाचीं निरनिराळीं पदकें दिलीं. हा खिताब देते वेळेस गव्हरनरसाहेबांनीं त्रिवर्ग कंपानियन यांजबरोबर पृथक संभाषण केलें, व त्या त्रिवर्गांनीं त्यांस जबाब दिले; परंतु हा वृत्तांत रघुनाथराव अंणासाहेब यांचा आहे सबब गव्हरनरसाहेब यांनीं त्यांजबरोबर जें संभाषण केलें व त्यांनीं जो त्याचा जबाब दिला त्याचा उतारा आम्ही खालीं दाखल करितों.

गव्हरनर साहेब म्हणाले, " रघुनाथराव विठ्ठल! नेक नामदार व्हाइसरॉय व ग्रॅंड मास्टर ऑफ् धि स्टार ऑफ् इन्डिआ यांचे हुकुमावरून कंप्यानियन या पदवीचे चिन्हांसहित ती पदवी देणारी जी मलिकामुआझमा त्यांचे सहीची सनद मी तुम्हास मोठ्या संतोषानें देतों. तुम्ही व तुमचे घराण्यानें आपले देशबांधवांस जें चांगलें उदाहरण दाखविलें तें मलिकामुआझमा यांस पसंद होऊन तुह्मी ज्या भारदास्त प्रतीचे गृहस्थ आहां त्या प्रतीविषयीं त्यांनीं आपली खुष मर्जी दर्शविली त्याचें एक प्रमाण म्हणून ही त्यांचे मेहेरबानगीची खूण आहे असें तुम्ही व तुमचें घराणें व दक्षिणेंतील संस्थानिक हे मानितील अशी मी उमेद बाळगितों. माजी पेशव्यांचे पदरचे लोकांमध्यें सर्वांत शूर, इमानदार व प्रतिष्ठित म्हणोन तुमचे पूर्वजांचें नांव इतिहासांत प्रसिद्ध आहे. बुडणारे राजघराण्याशीं त्यांनीं जी इमानदारी ठेविली ती केवळ अपूर्व आहे. तत्रापि त्यांनीं मागाहून वर्त्तणूक केली तेणेंकरून आनरेबल् मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन व सर जान मालकम् यांजकडून त्यांस बहुमान मिळाला व त्यांचा कित्ता व त्यांनीं केलेली व्यवस्था येणेंकरूनच तुम्ही व तुमचे बंधू हे आपले नांवास व दरजास योग्य होण्यास तरबेज झालां आहां. तुमची स्वतःची जाहागीर ही चांगले वहिवाटीचा एक नमुना होय. तुमचे दोन बंधूंपैकीं एकजण (रावबाहादुर कृष्णराव विठ्ठल) यांनीं नेटिव जडज्य या नात्यानें व दुसरे बंधू (माधवराव विठ्ठल) यांनीं मुंबई येथील गव्हरनर यांचे कायदे कौन्सिलांतील आडिशनल मेम्बर या नात्यानें आमचे सरकारची चांगली नौकरी बजाविली आहे. मी मोठ्या उत्कंठेनें अशी आशा करितों कीं, दक्षिणेंतील सरदारांपैकीं बहुतेक तुमचे कित्त्याबरहुकूम वागतील. आपले स्वतःचें व आपले पदरचे लोकांचे खरे हिताकडे लक्ष्य देऊन ह्या तुमच्या कित्त्याप्रमाणें ते वर्त्तणूक करतील तर प्रतिष्ट

मिळविण्यास त्यांस अद्यापीही मार्ग खुला आहे असें त्यांनीं मनांत समजावें. ”

त्याजवर विंचूरचे चीफ् यांनीं जवाब दिला तो,—“ नेकनामदार साहेब! कंपानियन ऑफ् धि मोस्ट एक्झाल्टेड आर्डर ऑफ धि स्टार ऑफ इन्डिया या दरजाचे लोकांचे पटांत माझें नांव घालण्यांत परम दयाळू माहाराणीसाहेब यांनीं मला जो बहुमान दिला त्याची योग्यता मी किती मोठी समजतों तें मला पुरेतपणीं बोलून दाखवितां येत नाहीं. मी आंसाहेबांस खातरीनें सांगतों कीं, माहाराणीसाहेबांचे मेहरबानगीचे ह्या चिन्हानें ग्रेट ब्रिटनचे राज्याशीं विंचूरकर घराण्याचें संघट्टण हाल्लीं पूर्वीपेक्षां अधिक दृढ होऊन ज्या सरकाराशीं आमचा आजरोजीं इतक्या प्रतिष्टेनें संबंध झाला आहे त्या सरकारचे ताबेदारींत पूर्वीपेक्षां अधिक परिश्रम करण्यास माझे घराण्याचे पुरुषांस उत्तेजन येईल. ”

नंतर हाजिर असलेले राजे व संस्थानिक व सरदार यांस अत्तर, गुलाब व विडे वांटण्यांत येऊन दरबार बरखास्त झाला. नंतर गव्हरनरसाहेब वगैरे सर्व साहेबलोक व मडमा आपआपले बंगल्यास परत गेल्या. फक्त पोलिटिकल् एजेंट मात्र मागें राहिले. त्यांनीं आपापले ताब्यांतील राजे, संस्थानिक व सरदार यांस शिष्ट सांप्रदायाप्रमाणें बिदा करून दिलें.

नेक नामदार गव्हरनरसाहेब यांस नजर करण्यास्तव रघुनाथराव वगैरे बडे लोकांनीं त्यांची तसबीर काढवून ती त्यांसदाखविल्याचा मजकूर पूर्वी लिहिलाच आहे. वर सांगितलेला बडा दरबार झाल्याचे दुसरे दिवशीं सदई तसबीर त्यांस नजर करण्यास्तव त्याच तंबूंत पृथक दरबार करण्याविषयीं वर लिहिलेल्या बडेलोकांमध्यें बेत ठरला. आणि त्या दिवशीं दोन प्रहरां नंतर रघुनाथराव व दक्षिण व दक्षिण माहाराष्ट्र देश यांतील जमलेले बहुतेक संस्थानिक व सरदार यांनीं नेक नामदार गव्हरनरसाहेबांचे गणेशखिंड येथील बंगल्यावर जाऊन त्यांस दरबारचे तंबूस येण्याविषयीं विनंति केली. गव्हरनर साहेबांनीं ती विनंति मान्य केल्यावर सर्व सं-

स्थानिक व सरदार हे आपआपले लवाजम्यानिशीं दरबारचे ठिका-णीं जाण्यास निघाले. त्यांचे मागून गव्हरनरसाहेब बॉडीगार्डाचे स्वारांनिशीं कितीएक मोठे दरजाचे दरबारी व लष्करी साहेब लोक बरोबर घेऊन आपले बंगल्यांतून निघाले. ही एकंदर स्वारी नारायण पेठेंतील लकडी पुलावरून शहरांत आली; आणि सदाशिव पेठचा हौद, नगरकरांचा वाडा, गवत्या मारुती व बुधवारचा वाडा यांवरून आदितवारचे चौकांत गेली; नंतर तेथून रास्त्यांचे वाड्यावरून व पुढें गोसावीपुऱ्यामधून गारपिरावर जाऊन दरबाराचे तंबूस पोंहोंचली. त्या वेळेस शिरस्तेप्रमाणें सालामीच्या तोफा झाल्या. या ठिकाणीं बसण्याची वगैरे सर्व व्यवस्था कृष्णराव बापूसाहेब विंचूरकर यानीं उत्तम प्रकारें ठेविली होती. या दरबारास इतर बहुत साहेबलोक व मडमा आल्या होत्या. शिवाय, मुंबईंतील कित्येक बडे लोक व पुण्यांतील सर्व बडे लोक आले होते. दरबारचे तंबूबाहेर शहरांतील इतर लोकांची फार मोठी गर्दी जमली होती. गव्हरनरसाहेबांस ताजिम देण्यास्तव सर्व संस्थानिक व सरदार वगैरे पुढें जाऊन आपापल्या ठिकाणीं उभे राहिले होते; आणि गव्हरनरसाहेब जाऊन तख्तावर बसल्यावर त्या बडेलोकांनीं संकेताप्रमाणें जॉनसनसाहेबांनीं काढिलेली तसबीर मोठ्या आदरानें त्यांस नजर करून तिजबरोबर त्यांस इंग्रजी मानपत्रही दिलें. हें मानपत्र कृष्णराव बापूसाहेब विंचूरकर यानीं वाचिलें. नंतर अत्तर, गुलाब व विडे वाटण्यांत येऊन दरबार बरखास्त झाला. हें झाल्यावर रघुनाथराव वगैरे संस्थानिकांनीं गव्हरनरसाहेब व इतर साहेब लोक यांस विक्टोरिया बागेजवळ नेऊन तेथें एक मंडप तयार केला होता त्यांत खुर्च्यांवर बसविलें. दरबारचे बंगल्यापासून या ठिकाणापर्यंत रोषनी दुतर्फा केलेली होती. नंतर जगंनाथ शंकरशेठ यांचे मार्फत बापूसाहेब विंचूरकर यांनीं जी आतषबाजी (दारूकाम) करविली होती ती सोडण्यास आरंभ झाला. ही कर्मणूक रात्रीं दाहा वाजत तोंपर्यंत झाली. नंतर

सर्व साहेबलोक व मडमा आणि सर्व संस्थानिक वगैरे आपआपले ठिकाणीं परत गेले.

तसबिरीचे संबंधाचा दरबार झाल्यावर दुसरे दिवशीं वर लिहिलेले संस्थानिक व सरदार एकत्र जमून त्यांनीं असा विचार ठरविला कीं, जॉनसनसाहेब यांकडून लेडीफिअर, कमान्डर इनचीनफ् व इतर कौन्सिलदार यांच्या निरनिराळ्या तसबीरा काढवून त्या नेकनामदार गव्हरनरसाहेब यांचे तसबिरी जवळ ठेवाव्या. शिवाय, त्याच चितान्याकडून हाजिर असलेला प्रत्येक संस्थानिक व सरदार यानें आपली तसबीर काढवून त्या सर्व तसबिरा गव्हरनरसाहेब यांचे तसबिरीचे आसपास त्याच जागीं ठेवाव्या. पुढें थोडेकच दिवसांनीं हा ठराव त्या बडेलोकांनीं नामदार एलीस साहेब कौन्सिलदार यांचे मार्फत गव्हरनरसाहेब यांचे कानावर घालून त्याप्रमाणें करण्याविषयीं त्यांची परवानगी मागितली. ती मिळाल्यावर त्या बडे लोकांनीं एकंदर तसबिरा काढविण्याचे तजविजीसाठीं एक कमीटी नेमली. तींत नामदार एलीस साहेब हे अध्यक्ष असून बापूसाहेब विंचूरकर व आबासाहेब कुरुंदवाडकर हे मेम्बर होते. ह्या कमिटीनें जॉनसनसाहेब यांजकडून वर लिहिलेल्या तसबिरा काढविल्या व प्रत्येक संस्थानिक व सरदार यानेंही पूर्व संकेताप्रमाणें आपली तसबीर काढविली. त्या सर्व तसबिरा कौन्सिल हॉलांत नेक नामदार गव्हरनर साहेब यांचे तसबिरी जवळ ठेवण्यांत आल्या. त्यांत रघुनाथराव यांचीही तसबीर आहे हें लिहिणें नकोच.

वर लिहिलेल्या गोष्टी झाल्यावर रघुनाथराव व कृष्णराव विंचूरकर हे उभयतां विंचुरास गेले, आणि त्यांचे कनिष्ट बंधु माधवराव हे अक्कलकोटचे राजांस घेऊन अक्कलकोटास निघून गेले.

सन १८६७ चे आखेरीस आफ्रिका खंडांतील अबिसीनिया (हबष) देशावर इंग्रज सरकारानें स्वारी केली. त्या वेळेस त्यानें हिंदुस्थानांतील किती एक काळीं पलटणें लढाई करितां नेलीं.

त्या संधीस "आम्ही सरकारास यथाशक्ति मदत करण्यास तयार आहों." म्हणून रघुनाथराव यांनीं त्या वेळेचे मुंबईचे गव्हरनर सर सिमोर वी. सी. फिट्झिराल्ड साहेब यांस पत्र लिहिलें. त्याचे जबावांत साहेबमोसूफ यांनीं तारीख २० फेब्रुआरी सन १८६८ चें पत्रानें रघुनाथराव यांस आपले आभार कळविले.

पुढें सन १८६८ चे मार्च महिन्यांत माधवराव विंचूरकर हे रजा घेऊन अक्कलकोटाहून विंचुरास आले. तेव्हां त्रिवर्ग बंधूंनीं वडिलार्जित स्थावर मिळकतीच्या आपसांत वांटण्या करण्याचा विचार काढिला; परंतु जम बसेल असें वाटेना. सबब रघुनाथराव यांनीं रावबाहादूर गोपाळराव हरी देशमुख यांस विंचुरास येण्याविषयीं पत्र लिहिलें. त्यावरून देशमुख हे विंचुरास आले. तेव्हां आपली समाईक इनामगांवें, वतनें, मिराशीजमिनी, वाडे व घरें यांची समभाग वांटणी करून देण्यास्तव व सरंजामाचे उत्पन्नावर दर शेंकडा रुपये साडेसात प्रमाणें प्रत्येक कनिष्ट बंधूस रघुनाथराव यांनीं द्यावें असा पूर्वी सरकारचा ठराव झाला होता त्याप्रमाणें सरंजामी गांवांचे उत्पन्नांची एक नक्की बेरीज ठरवून त्या बेरजेचे मानानें कृष्णराव व माधवराव यांस नक्त नेमणुका किंवा त्यांचे ऐवजीं सरंजामगांवांपैकीं गांव नेमून देण्यास्तव त्रिवर्ग बंधूंनीं त्यांस लवाद नेमिलें. त्याबरहुकूम त्यांनीं त्रिवर्गांचीं निरनिराळी म्हणणीं समजून घेऊन प्रत्येक म्हणण्याबद्दल पुरावा घेतला; आणि त्रिवर्गांची समजूत घालून सर्वांचें समाधान केल्यावर एक ठराव लिहिला. त्या ठरावाच्या तीन प्रती त्रिवर्ग बंधूंनीं आपले वहिवाटी करितां घेतल्या. याप्रमाणें सरंजामी उत्पन्नांची व्यवस्था लागल्यावर रावबाहादूर यांनीं इनामगांव, वतनें, मिराशीजमिनी, वाडे, व घरें यांचीही योग्य वांटणी करून दिली. तेणें करून त्रिवर्ग बंधूंचें समाधान होऊन बखेडा मिटला. हें खासगी काम झाल्यावर माधवराव हे अक्कलकोटास परत गेले असते; परंतु वर लिहिलेल्या वांटणीच्या कामास दिरंग लागण्याचा संभव दिसल्यामुळें त्यांनीं

सरकारापाशीं एक वर्षाची रजा मागितली. परंतु ती न मिळाल्यामुळें त्यांस अक्कलकोट येथील रीजेंटचे हुद्याचा राजीनामा देणें भाग पडलें.

राजधर्माचे पुस्तकाविषयीं. माहाभारत ग्रंथांतील शांति पर्वांत भीष्मानीं धर्मराजास आपद्धर्म, राजधर्म, मोक्षधर्म व दानधर्म हे चार धर्म सांगितले आहेत. त्यांपैकीं रघुनाथराव यांनीं राजधर्माचें मराठी भाषांतर करून त्याचें एक पृथक पुस्तक छापवून प्रसिद्ध केलें; आणि त्याच्या प्रती सरकारी अधिकारी साहेब, एतद्देशीय विद्वजन व सभ्य गृहस्थ यांस नजर पाठविल्या. त्यावेळेस त्यांनीं मलिका मुअझमा यांचे सरकारचे हिंदुस्थानाबद्दलचे सेक्रेटरी, इंडियाचे व्हाइसराय व गव्हरनर जनरल आणि मुंबईचे गव्हरनर यांसही निरनिराळ्या प्रती आदरपूर्वक नजर पाठवून दिल्या. या सर्व प्रतीचा त्या थोर अधिकाऱ्यांनीं स्विकार करून पुढें सन १८७० इ० सालीं त्या पावल्याचे जबाब रघुनाथराव यांस पाठवून त्यांत त्यांची तारीफ केली.

सन १८६९ सालीं विंचूर येथें एक गोष्ट झाली; ती कांहीं महत्वाची वाटल्यामुळें आह्मी ती थोडक्यांत पुढें लिहितों.

बडोद्याचे गायकवाड खंडेराव माहाराज यांचे पदरीं भाऊशिंदे या नांवाचे एक मराठे गृहस्थ होते. ते त्यांचे कृपेंतील असल्यामुळें त्यांनी त्यांस आपले दिवाण करून नाशिक जिल्ह्यापैकीं चांदवड तालुक्यांत त्यांचे वतनाचा गांव देवरगांव हा त्यांस इनाम करून देण्याचा निश्चय केला; परंतु तो गांव त्यांचे अमलांत नसून इंग्रजी अमलांत होता, सबब त्याचे मोबदला आपले राज्यापैकीं तितक्याच आकाराचा एक गांव त्यांनीं इंग्रज सरकारास देऊन तो [देवरगांव] शिंदे यास इनाम करून दिला. त्या गांवीं आपले कुटुंबाचीं माणसें राहाण्याकरितां शिंदे यानीं बहुत पैसा खर्च करून इंग्रजी पद्धतीचा एक वाडा बांधिला; आणि त्याचे घरभरणीकरितां ते स्वतः त्या सालीं आपले घरीं आले. तो विधी आटपल्यावर ते रघुनाथराव यांचे भेटी करितां विंचुरास आले. परस्परें

भेटी झाल्यावर त्यांनीं रघुनाथराव यांस आपले गांवीं मंडळीनिशी मेजवानीस येण्याचें आमंत्रण केलें. तें स्वीकारून रघुनाथराव हे नेमलेल्या दिवशीं आपले कनिष्ट बंधू बापूसाहेब व दादासाहेब व पदरची दरोबस्त मंडळी यांसहवर्तमान देवरगांवास गेले. भाऊ शिंदे यांनीं त्रिवर्ग बंधूंस सामोरें येऊन सन्मानानें आपले वाड्यांत नेऊन बसविलें. भोजन झाल्यावर शिंदे यांनीं त्रिवर्ग विंचूरकर बंधू यांस आपले हातांनीं अत्तर, गुलाब व पानसुपारी देऊन नंतर त्यांस निरनिराळे उंची पोषाग दिले. शिवाय त्यांनीं रघुनाथराव यांस एक घोडा नजर केला आणि त्यांचे पदरचे मंडळीसही ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणें पोषाग दिले. नंतर शिष्टसांप्रदायाप्रमाणें थोडा वेळ परस्परें भाषण झाल्यावर शिंदे यांनीं सर्वांस योग्य रीतीनें बिदा करून दिलें.

पुढें भाऊ शिंदे यांस उलट मेजवानीचें आमंत्रण कर्ण्यास्तव रघुनाथराव यांनीं आपले बंधू बापूसाहेब यांस देवरगांवास पाठविलें. तें आमंत्रण स्विकारून भाऊ शिंदे आपले ताबेदारमंडळीनिशीं नेमलेले दिवशीं विंचूरचे वाड्यांत आले. तेथें मराठे दरबारचे रीतीप्रमाणें उंची बिछायत केलेली असून कळवंतिणीचा नाच ही उभा केलेला होता. भोजन झाल्यावर रघुनाथराव यांनीं शिंदे यांस पानसुपारी, अत्तर गुलाब, आणि पोषाग देऊन मागाहून एक मौल्यवान घोडाही बक्षिस दिला. त्याचप्रमाणें बापुसाहेब यांनीं शिंद्यांचे मंडळीस ज्याचे त्याचे योग्यते प्रमाणें पानसुपारी, अत्तर गुलाब, आणि पोषाग दिले. नंतर रघुनाथराव यांचा निरोप घेऊन शिंदे लासलगांव स्टेशनावर गेले आणि आगगाडींत बसून बडोद्यास गेले.

बडोद्यास पोंहोचल्यावर शिंदे यांनीं विंचूर येथें आपल्यास झालेल्या सत्काराची खबर खंडेरावमाहाराजगायकवाड यांस कळवून रघुनाथराव यांची मोठी प्रशंसा केली; आणि आपले दरबारांत बापूसाहेब विंचूरकरां सारिखे हुशार गृहस्थ असावे

अशी त्यांस सूचना केल्यावरून, गायकवाड माहाराजांनीं रघुनाथराव यांस खलिता पाठवून बापूसाहेब यांस भेटीस्तव एक वेळा बडोद्यास पाठवून द्यावें असें लिहिलें. त्याप्रमाणें रघुनाथराव यांनीं बापूसाहेबांस माफीक लवाजम्यानिशी बडोद्यास पाठवून दिलें. बापूसाहेबांचे पेशवाईकरितां खंडेराव माहाराजांनीं भाऊ शिंदे यांस तेथील आगगाडीचे स्टेशनावर पाठवून त्यांचे उतरण्या राहाण्याची सर्व व्यवस्था आपलें एका बागेंत लावून ठेविली. दुसरे दिवशीं खंडेराव माहाराजांनीं बापूसाहेब यांचीं भेट स्विकारिली. पुढें एक दोन भेटी झाल्यावर माहाराज बापूसाहेबांस म्हणालें कीं, " आपण इंग्रजी कामकाजांत चांगले वाकिफगार आहां: याकरितां या दरबारचे तर्फेनें रेसिडेंटसाहेबांकडे जें काम पडेल तें आपण करीत जावें, म्हणजे आम्हास मोठी मदत होईल. " परंतु बापूसाहेबांनीं माहाराजांस मोठ्या चातुर्यानें जबाब दिला. ते म्हणाले, " इंग्रज सरकारचे पदरीं माझी नौकरी बहुत वर्षें झाली असून अणखी एक दोन वर्षें झाली म्हणजे मला पेनशन् मिळेल; याकरितां माहाराजांचे ह्मणण्याप्रमाणें कर्ण्यास तूर्त सवड नाहीं. " त्याजवर खंडेराव माहाराज म्हणाले कीं, " तुह्मी ह्मणतां हें ठीक आहे व त्याप्रमाणें तुह्मी सरकारी नौकरीवर जावें; परंतु तुमचे चिरंजीव नरसिंगराव हे विद्यमान येथें असून तेही इंग्रजी कामांत चांगले वाकिफगार आहेत; याकरितां त्यांस तरी येथें ठेवून द्यावें. " हें म्हणणें मात्र बापूसाहेब यांस तात्काळ नाकबूल करितां आलें नाहीं. मग त्यांनीं माहाराजांस असें कळविलें कीं, " हरएक गोष्टींत आह्मीं आज वर आपले वडील बंधूंचे आज्ञेप्रमाणें वागत आलों आहों; याकरितां चिरंजीवांस येथें ठेवण्याचे बाबदींत त्यांस विचारून मागाहून जबाब लिहून कळवूं. तूर्त त्यांस माहाराजांचे मर्जीप्रमाणें येथें ठेवून देतों. " त्याप्रमाणें माहाराजांनीं रावसाहेब चिंनूरकर यांस तेथें ठेवून घेऊन बापुसाहेब यांस बहुमानानें वि-

क्षाकरून दिलें. रावसाहेब हे बडोदा येथें असतां तेथील उन्हाळा त्यांस न सोसून ते आजारी पडले, आणि पुढें तेथें राहिल्यानें आपली तबियत फारच बिघडेल असें त्यांस वाटल्यावरून ते माहाराजांचे परवानगीनें तेथून निघून आपले वडिलांकडे गेले. पुढें बडोद्याचें हवापाणी आपले तबियतीस मुळींच मानणार नाहीं असें त्यांस वाटल्यावरून ते पुनः बडोद्यास गेले नाहींत.

प्रकरण ३.

मालिका मुआझमा यांचे द्वितीय चिरंजीव ड्यूक आफ् इंडिबरो यांचे मुंबईस आगमन. सन १८६९ इसवीचे आखेरीस ड्युकसाहेब यांची स्वारी हिंदुस्थान पाहाण्याचे इराद्यानें लंडन शहराहून निघाली. या सफरेंत त्यांजबरोबर किती एक लार्ड पदवीचे साहेब लोक आले होते. ड्यूक साहेब आगबोटींतून प्रथम भागिरथीचे किनाऱ्यावर कलकत्ता येथें उतरले. त्या वेळेस हिंदुस्थानांत लार्ड मेयो नांवाचे गव्हरनर जनरल होते. त्यांनीं ड्यूकसाहेबांचा उत्तम प्रकारें सत्कार करून त्यांकरितां बडा दरबार केला. त्या दरबारास उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक राजे, नवाब, व सरदार गेले होते. त्या प्रसंगीं गव्हरनर जनरल यांनीं मलिका मुआझमा यांचे प्रतिनिधी या नात्यानें ड्यूकसाहेबांस "ग्रांड मास्टर आफ धि मोस्ट एक्झालटेड आर्डर आफ् धि स्टार आफ इंडिया" असा खिताब दिला. शिवाय, त्यांनीं आपले बंगल्यांत रात्रीं मोठी रोषनी करून ड्यूकसाहेबांस बाल (मडमांचा नाच) व जाफत दिली. नंतर आतषबाजी (दारूकामें) सोडून मोठी मौज दाखविली. त्या प्रसंगीं कलकत्ता शहरांतील सावसावकार व मोठमोठाले सौदागर यानीं ही शहरभर मोठी रोषनी करून जागोजाग कळवंतिणींचे नाच व गाणीं व इतर आनंदप्रदर्शक कृत्यें केलीं. त्याचप्रमाणें त्या शहरांतील म्युनिसिपालिटीनें सडकांवर ठिकठिकाणीं कमानदार दरवाजे उभेकरून त्यांजवर मोठी रोषनी केली.

पुढें सन १८७० इसवीचे अव्वलीस डयूक साहेबांची स्वारी कलकत्याहून निघून मुंबई शहरास आली. त्या शुभदायक प्रसंगीं मुंबई शहरांत ही गव्हरनरसाहेबांनीं डयूकसाहेबांचे सत्काराकरितां आपले इलाक्यांतील राजे, संस्थानिक व सरदार यांस आमंत्रणें केल्यावरून ते सर्व मुंबईस जाऊन राहिले. या थोर समाजांत सरकारचे पत्रावरून रघुनाथराव अंणासाहेब व कृष्णराव बापूसाहेब हेही गेले होते. त्यांचे कनिष्ट बंधू माधवराव दादासाहेब हे शीतज्वरानें आजारी असल्यामुळें त्यांचे जाणें झालें नाहीं.

डयूकसाहेबांची स्वारी बोरीबंदराचे स्टेशनावर आगगाडींतून उतरण्याचे वेळेस गव्हरनरसाहेब हे कमांडर इन् चीफ, इतर कौन्सिलदार, हायकोर्टाचे चीफ जास्टिस व ज्यडज्य, इतर मोठाले अधिकारावरील साहेब लोक व तेथें येऊन राहिलेले दरोबस्त राजे, संस्थानिक व सरदार यांसहवर्तमान डयूकसाहेबांचे सत्कारार्थ उभे राहिले; आणि ते स्टेशनचे सपाट फरसावर उतरतांच त्यांचे आदाब योग्यारीतीनें बजावून त्यांस समारंभानें परळ येथील सरकारी बंगल्यावर नेलें. दुसरे दिवशीं डयुकसाहेबांची स्वारी गोदी, टांकसाळ व गिरण्यां वगैरे मोठे कारखाने पाहावयास गेली. तिसरे दिवशीं गव्हरनरसाहेबांनीं त्यांस बडा खाना देऊन बाल (मडमांचा नाच) दाखविला; आणि सेक्रेटरी हपिसांत ग्यास लाइटची (वाफेने जळणाऱ्या दिव्यांची) रोषनी करून तेथें डयूकसाहेबांची स्वारी आल्यावर समुद्र किनाऱ्यावर आतषबाजी (दारूकामें) सोडण्यांत आली. या ठिकाणींही शेंकडों साहेब लोक व मडमा व नेटिवराजे, संस्थानिक व सरदार गेले होते. पुढें थोडकेच दिवसांनीं परळ येथील बंगल्यांत लेवी (धूळभेट) झाली. त्या वेळेसही गुजराथ, व काठेवाड येथील व दक्षिण व दक्षिणमाहाराष्ट्रदेश यांतील समस्त नेटिवराजे, संस्थानिक व सरदार हे हाजिर होते. रघुनाथराव यांनीं तेथें आलेल्या राजांपैकीं खंडेराव माहाराज गायकवाड यांचीं भेट घेतली. त्यावेळेस माहाराजांनीं रघुनाथराव यांचा परम आदरानें सत्कार केला.

डयूकसाहेब यांचे सन्मानार्थ व त्यांचे आगमनाचें एक स्मारक कृत्य म्हणून शहर पुणें पेंठ बुधवार येथें बुधवारचे वाड्याचे ईशान्येकडील कोंपऱ्यावर एक मोठें घड्याळ स्थापन कर्ण्याविषयीं रघुनाथराव यांनीं मुंबईचे गव्हरनरसाहेबांचे मार्फत डयूकसाहेबांचे अनुमत घेऊन तेथें नेटिव जनरल लैब्ररीवर सर्वांचे दृष्टीस पडेल अशा प्रकारची उंच इमारत बांधून तिजवर तें घड्याळ स्थापन केलें. *

डयूकसाहेबांची स्वारी मुंबई येथे असतां तेथे त्यांजकरितां अनेक प्रकारचे उत्साव झाल्यावर ते इंग्लंडास परत गेले.

याच वेळेस ब्राह्मण जातीचे गतभर्तृकेचा पुनर्विवाह कर्णें शास्त्रसंमत आहे किंवा शास्त्राविरुद्ध आहे याचा निर्णय करण्यास्तव कोल्हापूरचे मठांतील श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांचें पुणें शहरास आगमन होऊन उभयपक्षांचे शास्त्रीलोकांमध्यें कित्येक दिवस वाद झाला.

या वादाचे वेळेस हाजिर राहाण्यास्तव श्रीजगद्गुरूकडून दक्षिणेतील दरोबस्त ब्राम्हण संस्थानिकांस बोलावणीं झालीं. त्याच प्रमाणें रघुनाथराव हे डयूकसाहेबांचे दरबाराकरितां मुंबईस गेले असतां तेथें त्यांस बोलावणें कर्ण्यास्तव श्रीजगद्गुरूकडून एक कारकून आला. रघुनाथराव यांस श्रीजगद्गुरूंचे आज्ञे प्रमाणें पुण्यास जाण्याची मोठी उत्कंठा होती; परंतु त्यांचे कनिष्ट बंधु-माधवराव यांची प्रकृती विंचूर येथें फार बिघडलेली असल्यामुळें त्यांस विंचुरासच परत जाणें भाग पडलें. तथापि, आपले न येण्याचें कारण श्रीजगद्गुरूंस कळविण्यास्तव त्यांनीं शंकर शास्त्री या नांवाचे आपले एका आश्रितास पुण्यास पाठवून दिलें.

सन १८७१ इ. चे डिसेंबर (मार्गशीर्ष) महिन्यांत रघुनाथराव यांची सापत्न मातुश्री लक्ष्मीबाई साहेब यांस देवाज्ञा झाली.

---

* आलीकडे बुधवारचा वाडा जळून गेला तेव्हां त्या बरोबर तें घड्याळही जळून गेलें.

त्यांचें उत्तरकार्य त्यांचे सख्खे कनिष्ट पुत्र माधवराव यांनीं गोदातीरीं आपले घराण्याचे रिती प्रमाणें केलें. बाईंचे सख्खें जेष्ट पुत्र कृष्णराव हे सातारा येथें सदरअमिनींचे हुद्यावर असल्यामुळें आपले मातूश्रीचे अंतकालीं व उत्तरकार्याकरितां त्यांचें येणें झालें नाहीं.

सन १८७२ इ० सालीं हिंदुस्थानचे त्यावेळचे गव्हरनर जनरल लार्ड नार्थब्रुक साहेब यांची स्वारी मुंबई शहरास येण्याचें ठरलें, तेव्हां त्यांचे सत्कारार्थ बंगाल, मद्रास आणि मुंबई या इलाक्यांतील नेटिव माहाराज, राजे, संस्थानिक व सरदार यांस मुंबईस अमुक तारिखेस येण्याविषयीं सरकारीं पत्रें गेल्यावरून ते सर्व तेथें येऊन राहिले.

लार्डसाहेब बोरीबंदराचे स्टेशनावर उतरण्याचे वेळेस मुंबईचे गव्हरनरसाहेब हे कमांडर इन्चीफ व आपले इतर कौन्सिलदार, सेक्रेटरी, हायकोर्टाचे चीफजास्टिस व ज्यडज्य, व मोठ्या दर्जाचे इतर दरबारी व लष्करी साहेब लोक आणि तेथें आलेले दरोबस्त राजे रजवाडे यांसहीत त्या स्टेशनावर उभे राहिले. लार्डसाहेब आगगाडींतून प्लाटफार्मावर उतरतांच सर्वांनीं त्यांचे आदाब योग्य रितीनें बजाविले. नंतर गव्हनरसाहेबांनीं लार्डसाहेबांस घोड्याचे वाहनांत बसवून त्यांचे जिलेबीचे साहेबलोकांसुद्धां त्यांची स्वारी परळ येथील सरकारी बंगल्याकडे चालविली, आणि जमलेले राजेरजवाडे यांस आपापले बंगल्यावर परत जाण्यास परवानगी दिली.

पुढें एकदोन दिवसांनीं लार्डसाहेबांनीं क्यांपाचे मैदानांत दलबादल बादशाही तंबू उभे करवून त्यांत कांहीं संस्थानिक व साहेब लोक यांस स्टाराचे निरनिराळे खिताब देण्यास्तव दरबार केला. त्या दरबारांत स्टारच्या खिताबाचे जे महाराज वगैरे हाजिर होते त्यांपैकीं प्रमुखाची नांवें येणें प्रमाणें:—

१ माहाराज जयाजीराव शिंदे.	५ सर रावराजे दिनकरराव राजवाडे.
२ रिव्याचे माहाराज.	६ सर टी माधवराव.
३ भोपालची बेगम.	७ रघुनाथरावअंणासाहेब विंचूरकर.
४ सर सालारजंग, निजाम सरकारचे वजीर.	

लार्डनार्थब्रुकसाहेबांची स्वारी दरबारचे तंबू जवळ येण्याचे सुमारास सर्व माहाराज वगैरे आपापल्या दर्ज्याचीं निरनिराळीं निषाणें आपल्यापुढें चालवून, त्या तंबूपासून कांहीं अंतरावर हद्दीकरितां जो दरवाजा लाविलेला होता त्याजवळ उभे राहिले, आणि लार्डसाहेबांची स्वारी तेथें येतांच त्यांचे आदाब बजावून आपापल्या दर्जाप्रमाणें दरबारचे तंबूकडे चालले. त्या सर्वांचे मागून ग्रांडमास्टर (लार्डसाहेब) हे गेले. त्या तंबूंत गेल्यावर सर्व माहाराज वगैरे आपापले खुर्च्यांपुढे उभे राहिले, आणि मागून ग्रांडमास्टर येऊन खुर्चीवर बसल्यावर मग सर्व बसले.

ज्या साहेब लोकांस स्टाराचे खिताब मिळावयाचे होते त्यांस ते देण्यांत आल्यावर भोपाळच्या बेगमसाहेब यांनीं बुरख्यानिशीं ग्रांडमास्टरांपुढें येऊन त्यांचे आदाब बजाविले. मग ग्रांडमास्टर साहेबांनीं बेगमसाहेबांस जी. सी. एस्. आय. चा खिताब दिला. नंतर बेगमसाहेबांनीं स्टारच्या दर्ज्यांचे माहाराज वगैरे यांपैकीं प्रत्येकापुढें जाऊन इंग्रजी रितीप्रमाणें त्यांचे हातांत आपला हात घालून तो हालविला. [हें चिन्ह बेगमसाहेब ह्या त्यांच्या रफिक (सोबतिणी) झाल्याचें होय. हें झाल्यावर बेगमसाहेब नेमलेल्या खुर्चीवर बसल्या. नंतर थोड्या अवकाशानें सर्व माहाराज वगैरे उठले आणि आपापल्या दर्ज्याप्रमाणें निषाणें पुढें करून वर लिहिलेल्या हद्दीच्या दरवाज्याकडे चालतेझाले. त्यांचे मागून ग्रांडमास्टर निघाले. ही स्वारी त्या दरवाज्या जवळ पोंहोंचतांच माहाराज वगैरेनीं ग्रांडमास्टरांचे योग्य आदाब बजाऊन त्यांस बिदाकरून दिलें आणि सर्व आपापले डेऱ्यांस परत गेले.

दुसरे दिवशीं फक्त मुंबई इलाक्यांतील राजे, संस्थानिक व सरदार यांजकरितांच दरबार झाला. त्यांत मोघल बादशाहांचे दरबाराचे रीतीप्रमाणें समस्त राजे रजवाडे वगैरे यांनीं आपापले योग्यते प्रमाणें लार्ड नार्थब्रुक यांस मोहोरा नजर केल्या. त्यांचा लार्डसाहेबांनीं स्विकारकरून ज्याचे त्याचे योग्यते प्रमाणें सर्वांस खिल्लती * दिल्या.

यादरबारांत विंचूरचे चीफ रघुनाथरावअंणासाहेब यांनीं लार्ड साहेबांस १० दाहा मोहोरा नजर केल्या आणि लार्डसाहेबांनीं त्यांस पांच पार्च्यांची † खिल्लत दिली.

पुढें लार्डसाहेबांनीं प्रत्येक माहाराज वगैरे यांस उलट भेट देण्याविषयीं आपली इच्छा दर्शित केल्यावरून सर्वांनीं आपले बंगल्यांत त्यांचा निरनिराळे वेळेस सत्कार केला. नंतर लार्डसाहेबांनीं सर्व माहाराज वगैरे यांस आपापले राजधानीस परत जाण्यास परवानगी दिली.

रघुनाथरावअंणासाहेब विंचूरास परत जाण्याचे तयारींत असतां, लार्डसाहेबांची स्वारी उत्तर हिंदुस्थानांत परत जाईल त्या वेळेस आपलें जाहागीर गांव मनमाड येथें त्यांचा सत्कार करावा अशी त्यांस इच्छा प्राप्त झाल्यावरून, त्यांनीं ती इच्छा नामदार एलिस साहेब कौन्सिलदार यांचे मार्फत लार्ड साहेबांस कळविली. लार्ड साहेबांनीं ती पूर्ण करण्यांचें कबूल केल्यावरून रघुनाथराव यांनीं तावडतोब मनमाडास जाऊन तेथील आगगाडीचे स्टेशना जवळ लार्डसाहेबांचे सत्काराची सर्व प्रकारें तयारी केली; आणि ज्या तारीखेस व ज्या वेळेस त्या साहेबांची स्वांरी मनमाडचे स्टेशनावर यावयाची होती त्या तारीखेस व त्या वेळेस त्यांनीं तेथें पुष्कळ शिष्ट मंडळी निशी उभें राहून लार्डसाहेब आगगाडींतून खालीं उतरतांच त्यांचे आदाब बजाविले;

* पोषाग.

† वस्त्रांची.

आणि त्यांस सत्काराचे ठिकाणीं नेऊन तेथें त्यांस नानाप्रकारची मिठाई व मेवे नजर केले; आणि मागाहून हारतुरे, गजरे, छड्या, अत्तर, गुलाब आणि विडे दिले. त्या सर्वांचा लार्ड साहेबांनीं खुषमर्जीनें स्विकार केल्यावर त्यांजबरोबरचे साहेबलोकांस अत्तर गुलाब वगैरे वांटण्यांत आलें. लार्डसाहेब या ठिकाणीं आजमासे १८ मिनिटें बसल्या नंतर ते पुनः स्पेशल ट्रेनावर चढून पुढें खांडव्याकडे चालते झाले. नंतर रघुनाथराव विंचुरास परत आले.

माहाराज तुकोजीराव होळकर यांचा मनमाड येथें सत्कार व त्यांस विंचूर येथें मेजवानी. सन १८७३ इसवीचे डिसेंबर महिन्यांत माहाराज तुकोजीराव होळकर यांची स्वारी दक्षिणेंत जेजुरी वगैरे ठिकाणच्या यात्रा करण्यास्तव इंदुराहून आगगाडींत बसून निघाली. त्यांचा विचार प्रथम मनमाडचे स्टेशनावर उतरून नंतर तेथून सडकेनें नगरावरून जेजुरीस जावें असा होता. ही खबर इंदुराहून अंणासाहेब गरूड नायब दिवाण निसबत होळकर यांनीं रघुनाथराव अंणासाहेब यांस विंचुरास लिहून कळविली. विंचूरकर व होळकर यांचे घराण्यांमध्यें थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांचे वेळेपासून स्नेहसंबंध चालत आला होता; परंतु दरमियान इंग्रजी अंमल झाल्यामुळें उभय घराणीं दूरत्वावर राहून त्या घराण्यांचे मुख्य यांच्या परस्परें भेटी होण्याचा योग घडून आला नाहीं. त्या कारणानें पूर्वीचा स्नेहसंबंध मजीत झालाहोता. तो पुनः पुर्ववत नुतन व्हावा अशी रघुनाथराव यांचे मनांत बहुत दिवसांपासून इच्छा होती; परंतु तसें घडण्यास अनुकूल अशी संधी मुळींच आली नव्हती. तथापि, हाल्लींचे होळकर तुकोजीराव माराराज हे विंचूर संस्थानचे गांव मनमाड येथें उतरणार होते त्या योगानें पूर्वीचा स्नेहसंबंध पुनः नुतन कर्ण्यास ही संधी चांगली आहे असें रघुनाथराव यांस वाटून, होळकर माहाराजांचा मुक्काम खांडवा येथें असतां, त्यांजकडे त्यांनीं कारकून व शिपाई पाठवून दिले;

आणि त्यांचे सत्काराकरितां मनमाड येथें रेलवे स्टेशनाजवळ एक मोठा मंडप घालवून तेथें आपण स्वतः पदरचे सभ्य मंडळीनिशीं जाऊन राहिले. होळकर माहाराज मनमाडास येण्यापूर्वी एक-दोन दिवस त्यांचे पुष्कळ नौकरलोक पुढें येऊन त्यांनीं तंबू उभे केले आणि त्यांचे स्वारीचे हत्ती, घोडे, वगैरे खटल्याचे उतरण्याची मिसल लावून त्यांजकरितां सर्व तयारी करून ठेविली.

दुसरे दिवशीं रात्रीस सात वाजण्याचे सुमारास होळकरमाहाराजांची स्वारी आगगाडींतून उतरण्यापूर्वी रघुनाथराव आपले पदरचे प्रतिष्ठीत मंडळीनिशीं स्टेशनावर उभे राहिले. तेथें माहाराजांची स्पेशल ट्रेन येऊन ते त्यांतून उतरतांच रघुनाथराव यांनीं त्यांची आदरपूर्वक भेट घेतली. कांहीं वेळपर्यंत परस्परें आगतस्वागताचें भाषण झाल्यावर रघुनाथराव यांनीं माहाराजांस त्यांचे तळावर पोंहोंचतें केलें.

दुसरे दिवशीं तिसरे प्रहराचे सुमारास "भेटीस येतों" म्हणून माहाराजांनीं रघुनाथराव यांस निरोप पाठविला. त्यावरून रघुनाथराव यांनीं आपले मंडपांत बिछायत घालवून रोषनीही करविली; आणि कळंवतिणीचे ताफ्याचा नाच उभा करवून माहाराजांचे सत्काराची सर्व तयारी केली. पांच वाजण्याचे सुमारास होळकर माहाराजांची स्वारी पदरचे मानकरी, मुत्सद्दी, आणि दरबारी व लष्करी हुद्देदार यांसह सत्काराचे मंडपांत आली. रघुनाथराव यांनीं पुढें होऊन माहाराजांस मोठ्या आदरानें बसवून घेतलें. नंतर नृत्यास व गायनास आरंभ झाला. दरमियान माहाराज व रघुनाथरावअणासाहेब यांमध्यें बराच वेळ संभाषण झालें. त्यांत पूर्वापार चालत आलेल्या स्नेहसंबंधाच्या सर्व गोष्टी बोलण्यांत येऊन शेवटीं जो स्नेह नूतन झाला आहे तो चिरकाळ चालावा असें परस्परें भाषण झालें. इतक्यांत रघुनाथराव यांचे पदरचे विष्णूपंत छत्रे या नांवाचे ब्राह्मण चाबुक

स्वार हे त्यांचे पागेतील एक शिकविलेल्या घोड्यावर बसून मंडपाचे तोंडाजवळ आले. हे मनुष्य मोठे नामांकित चढाईत असून त्यांनींच तो घोडा शिकवून तयार केला होता. ते त्या घोड्यावर असतांच रघुनाथराव यांचे इषाऱ्या वरून मंडपांत आले. परंतु त्यांनीं तो घोडा इतके हलके कदम टाकीत आणिला कीं त्याचा कदम जरा देखील न वाजतां तो एकाएकी होळकर माहाराजांपुढें येऊन पोंहोंचला. मग विष्णूपंतानीं माहाराजांस त्या घोड्यावरूनच मुजरा केला. त्या घोड्याची कर्तबगारी पाहून माहाराज फार खुश झाले. मग रघुनाथराव यांनीं माहाराजांस आर्बी जातीची एक घोडी नजर केली. सुमारें २ तास बसल्यावर माहाराजांनीं आपले छावणीस परत जाण्याची इच्छा दर्शित केल्यावरून रघुनाथराव यांनीं त्यांस अत्तर लाविलें आणि त्यांजवर गुलाबपाणी शिंपडून विड्यांचे तबक पुढें केलें. तें माहाराजांनीं आदरपूर्वक स्विकारिलें. मग रघुनाथराव यांनीं माहाराजांस विंचुरास चलण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. तेव्हां माहाराज बोलले कीं " मीं एव्हड्यानेंच तृप्त झालों असें नाहीं. जेजुरीहून परत येतांना मीं विंचुरास येऊन मेजवानी घेईन. " इतकें बोलून माहाराज उठले आणि रघुनाथराव यांनीं त्यांस शिष्टसांप्रदाया प्रमाणें बिदाकरून दिलें. दुसरे दिवशीं माहाराजांची स्वारी मनमाडाहून अहमदनगराकडे कूच करून गेली.

पुढें जेजुरीची यात्रा झाल्यावर, होळकर माहाराज पुणें वगैरे ठिकाणीं जाऊन शेवटीं विंचुराजवळ निफाड येथें आले. त्यांचे स्वारीबरोबर रघुनाथराव यांनीं दिलेले कारकून माधवराव भगवंत व कांहीं स्वार होतेच, त्यांजकडून रघुनाथराव यांस माहाराजांचे विंचुरास येण्याचे बेताची खबर येताच,त्यांनीं त्यांचे सत्काराची आपले सामर्थ्याप्रमाणें उत्तम तयारी केली; आणि त्यांचे पेशवाईकरितां स्वतः अर्ध्याकोसाचे अंतरावर जाऊन त्यांस आपले वा-

ड्यांत आणिलें. माहाराजांची खासा स्वारी उतरण्यास रघुनाथराव यांनीं आपले वाड्याचा दरोबस्त पुढील चौक खालीं करून ठेविला होता. तेथे सर्व खासी मंडळी उतरली. माहाराजांचे लष्कर गांवाबाहेर उत्तरेचे बाजूस कुरणाचे मैदानांत उतरलें असून मानकरी, मुत्सद्दी व हुद्देदार यांस गांवातील निरनिराळे लोकांचे घरातून जागा दिलेल्या होत्या. रघुनाथराव यांनीं रात्रीस माहाराजांचे भोजन वगैरेचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेविला. दुसरे दिवसीं सकाळीं माहाराजांची स्वारी आपले जन्मभूमीचें गांव करंजी हें पाहाण्यास गेली. मार्गांत नांदुर येथें गोदास्नान करून तेथून ती करंजीस गेली, आणि त्याचे दुसरे दिवसीं अस्तमानीं विंचुरास परत आली. रात्रीस पहिल्या प्रमाणेच सर्व प्रकारचा बंदोबस्त ठेवण्यात आला. दुसरे दिवसीं रघुनाथराव यांनीं माहाराजांस मोठी मेजवानीं केली. भोजन झाल्यावर अत्तर, गुलाब, विडे आणि पानसुपारी वाटण्यात आली, त्यावेळेस रघुनाथराव यांनीं माहाराज व त्यांचे उभयतां चिरंजीव यांस उत्तम प्रकारचे पोषाग दिले आणि हत्यारें ही नजर केलीं. त्याचप्रमाणें त्यांनीं माहाराजांचे पदरचे मंडळींस ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणें पोषाग दिले. तिकडे त्याच वेळेस सौभाग्यवती जानकीबाईसाहेब विंचूरकर यांनीं माहाराजांचे राण्यांस पैटण्या वगैरे उंची वस्त्रें दिलीं. नंतर माहाराजांची स्वारी तेथून निघाली आणि लासलगांवचे स्टेशनावर स्पेशल ट्रेनात बसून इंदुरास गेली.

मलिका मुआझ्झमा यांचे वडील पुत्र युवराज प्रिन्स् आफ वेल्स यांचे हिंदुस्थानांत आगमन. सन १८७५ इसवीचे सेप्टेंबर महिन्यांत युवराज यांची स्वारी इंग्लंड येथें सिरापिज नांवाचे आगबोटीत-बसून मुंबईस येण्यास निघाली. ही खबर मुंबईचे गव्हरनर यांस पूर्वीच कळली होती, सबब त्यांनीं मुंबई येथें त्यांचे सत्कारांकरितां उत्तम प्रकारें तयारी केली होती, व त्याचप्रमाणें आपले इलाक्यातील तमाम राजे, संस्थानिक व सरदार यांस युवराजांची स्वारी मुंबईस येण्यापूर्वी

तेथें येऊन राहण्याविषयीं पोलिटिकल एजेंट यांचे मार्फत हुकूम पाठविले होते. त्याप्रमाणें दरोबस्त राजे, संस्थानिक व सरदार हे त्या शहरास येऊन निरनिराळ्या बंगल्यांत आपापले लवाजम्यानिशीं राहिले. या प्रसंगीं विंचूरचे चीफ रघुनाथरावअंणासाहेब यांस ही पुण्याचे एजेंट साहेबांचे मार्फत सरकारचा हुकूम आल्यावरून ते मुंबईस जाऊन गिरगांवांत राहिले.

युवराज यांची स्वारी मुंबई जवळ येऊन पोहोंचल्यावर, त्यांचे पेशवाई करितां अमुक तारिखेस व अमुक वेळेस अमुक बंदरावर हाजिर होण्याविषयीं गव्हरनर साहेबांकडून जमलेले समस्त राजे, संस्थानिक आणि सरदार यांस सूचना झाल्या. त्याप्रमाणें अपालो [पालव्याचे] बंदरावर समाज जमला. त्या शिवाय पुष्कळ साहेब लोक व मडमा ही तेथें येऊन खुर्च्यांवर बसल्या होत्या. कांहीं अवकाशानें गव्हरनर साहेब हे कमांडर-इन-चीफ व दरोबस्त इतर कौन्सिलदार व सेक्रेटरी, हायकोर्टाचे चीफजस्टिस व ज्यडज्य व मुंबईतील इतरखात्यांचे मोठचा दर्ज्यांचे अधिकारीसाहेब यांस बरोबर घेऊन तेथें आले. त्याजवर थोडक्या वेळानें प्रीन्स साहेबांची स्वारी आगबोटींतून एका नांवेंत उतरून त्या बंदरावर आली. तेव्हां सलामीच्या तोफा सुटल्या. गव्हरनर साहेब पूढें होऊन त्यांनीं युवराज यांचे योग्य रीतीनें आदाब बजाविले. युवराज यांजबरोबर कित्येक प्रीन्स, ड्यूक व इतर थोर पदव्यांचे साहेबलोक होते. शिवाय, त्यांची सर्व प्रकारची व्यवस्था ठेवण्यास्तव मुंबईचे माजी गव्हरनर सर बार्टल फ्रीयर हे ही आले होते. युवराज पुढें चालले तेव्हां सडकेचे दोन्ही बाजूंस जे साहेबलोक व नेटिव राजे, संस्थानिक व सरदार उभे होते त्यांस ओळखून फ्रीयर साहेब हे युवराज यांस त्यांची नांवें सांगत गेले आणि त्यांनीं केलेली कुर्निष* स्विकारून युवराज हे त्यांस सलाम करीत गेले. याप्रमाणें युवराज सुमारें दोनशें कदम

* मुजरा.

पांयांनीं चालत गेल्यावर ते घोडयांचे गाडींत बसून पुढें चालते झाले. त्यांजबरोबर त्यांचे जिलेंबीचे साहेबलोक हे निरनिराळ्या गाड्यांतून बसून चालते झाले. नंतर सर्व नेटिव राजे, संस्थानिक व सरदार हेही आपापल्या गाड्यांतून बसून आपापल्या लवाजम्यानिशीं आपापल्या बंगल्यांस गेले.

वर लिहिलेल्या स्वारींत युवराज यांची गाडी पुढें असून तीचे दोन्हीं बाजूंस त्यांबरोबर इंग्लंडाहून आलेल्या बडे लोकांच्या गाड्या होत्या. त्यांचे मागून गव्हरनर, कमांडर-इन-चीफ व इतर कौन्सिलदार, आणि हाय कोर्टाचे चीफ जस्टिस व ज्यडज्य यांच्या गाड्या अनुक्रमानें होत्या. युवराज यांचे गाडीपुढें गव्हरनर साहेबांचे बाडीगार्ड (खासबारदार स्वार) आणि त्यांचे सन्मानार्थ जे सरकारी स्वार व पायदळ पलटन आणि बाजेवाले आले होते ते चालत होते. ही स्वारी क्यांपाचे मैदानांतून काळकादेवीचा रस्ता व भेंडीबाजार यांमधून परळ येथील सरकारी बंगल्यावर गेली. तेथें गव्हरनर व कमांडर-इन-चीफ यांनीं युवराज यांस उतरून घेऊन त्या बंगल्यांत नेलें. त्यांजबरोबर विलायतेहून आलेले सर्व बडेलोक हे त्याच बंगल्यांत शिरले, नंतर मुंबई येथील त्या स्वारीबरोबर गेलेले दरोबस्त साहेबलोक आपापले बंगल्यांस परत गेले.

दुसरे दिवशीं समस्तराजे, संस्थानिक व सरदार यांनीं युवराज यांस आपापले दरजाप्रमाणें अमोलीक वस्तू नजर केल्या. त्यांचा युवराजांनीं नेमलेल्या कमिटीचे मार्फत स्विकार केला.

युवराज यांचा मुक्काम मुंबई येथें सातआठ दिवस झाला. ज्याज्या ठिकाणीं त्यांची स्वारी गेली व ज्याज्या गोष्टी त्यांनीं केल्या त्यासंबंधीं हकीकत लिहिली तर एक मोठा ग्रंथच होइल, सबब ती येथें न लिहितां त्यातारिखांचे वर्तमान पत्रांतून पाहण्याविषयीं आम्हीं वाचकांस विनंती करितो.

विंचुरचे चीफ रघुनाथरावअंणासाहेब यांनीं संस्कृत भाषेत प-

घात्मक मानपत्र तयार करुन एल्फिन्स्टन कालेंजांतील संस्कृताचे प्रोफेसर मिस्तर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांजकडून त्याचे इंग्रजी भाषांतर करविलें; आणि तें एकंदर संस्कृत व इंग्रजी मानपत्र छापवून त्याची एक छापील प्रत युवराज यांस आदरपूर्वक नजर केली. तिचा युवराज यांनीं संतोषानें स्विकार केला.

मागाहून कांहीं दिवसांनीं युवराज यांजकडून रघुनाथरावअंणासाहेब यांस एकपत्रासह चांदीचें एक मेडल (पदक) आलें. त्यावर युवराज यांचा चेहेरा काढलेला असून " रघुनाथराव विठ्ठल विंचूरचेचीफ यांस बक्षिस दिलें अस्से. " असे शब्द वठविलेले होते.

मुंबई येथें रघुनाथराव यांचा मुक्काम असतां, त्या दरबारास आलेल्या दक्षिणेतील बहुतेक वडेलोकांच्या व त्यांच्या भेटी झाल्या. विंचुरास परत जाण्याचे सुमारास त्यांनीं मंगलदास नथुभाई यांचे गिरगांव येथील वाडींतील बंगल्यांत निजामसरकारचे वजीर सर सालारजंग मुख्त्यार उल-मुल्क्-बाहादूर यांस पानसुपारीस बोलाविले. त्याप्रसंगीं बराच वेळ पर्यंत फुरसतीने शिष्ट सांप्रदाया प्रमाणें परस्पर भाषण झाल्याने पुर्वीचा स्नेहसंबंध अधिक दृढ झाला. नंतर रघुनाथराव लौकरच विंचुरास परत आलें

पुढें युवराज यांची स्वारी बडोद्यास गेली आणि मुंबई येथें माघारी आल्यावर लागलीच रेलवेनें कलकत्यास गेली. तेथून बनारस, अलहाबाद, वगैरे ठिकाणें पाहातपाहात रेलवेनें इंदुरचे रेसिडेन्सीस परत आली; आणि शेवटीं मुंबईस परत येऊन तेथून आगबोटीनें स्वदेशास परत गेली.

सन १८७६ इसवी सालीं माहाराष्ट्र वगैरे दक्षिणहिंदुस्थानांतील सर्व प्रदेशांत पर्जन्य न पडल्यामुळें मोठा भयंकर दुष्काळ पडला. त्यामुळें अन्नपाण्यावांचून हजारों मनुष्यें मरूं लागलीं. या सार्वजनिक संकटाचे प्रसंगीं इंग्रज सरकारानें उदारमनानें लाखों अनाथ लोकांस धर्मार्थ पोशिलें; जागोंजाग मजुरिचीं कामें काढिलीं आणि गरीब लोकांस कामांस लावून त्यांचें पोटास दि-

हें. त्याचप्रमाणें राजेरजवाडे व सावकार लोक यांनीं ही अन्न-सत्रें घालून हजारों गरीब लोकांस त्या संकटांतून मुक्त केलें. रघुनाथराव यांनीं ही आपले जाहागीर गांवांतील शेतकरी लोकांस धान्य पुरवून त्यांचा व त्यांचे कुटुंबांचा बचाव केला. शिवाय, त्यांनीं विंचूर येथें दररोज अजमासे ५०० अनाथ मनुष्यांकरितां बाजरीच्या भाकऱ्या व पिठलें किंवा भाजी किंवा आंबटी तयार करवून प्रत्येक मोठ्या मनुष्यास ३ पासून ५ पर्यंत भाकऱ्या व त्या सोबत खाण्याचा पातळ पदार्थ, व लाहान मुलास २ भाकऱ्या व त्या मानानें सोबतचा पातळ पदार्थ, याप्रमाणें वांटविल्या. हा क्रम सरासरी सवावर्ष चालला. शिवाय, इंदूरचे माहाराज होळकर यांनीं रघुनाथराव यांजकडे १५०० रुपये त्याच प्रकारच्या धर्म कृत्याकरितां पाठविले होते. त्यांचाही रघुनाथराव यांनीं वर लिहिल्या प्रकारेंच व्यय केला.

याशिवाय, रघुनाथराव यांनीं आपले कुलस्वामीचें स्थान निरानरसिंहपूर येथेंही वरलिहिल्याप्रमाणेंच ज्वारीच्या भाकऱ्या व त्या सोबत खाण्याचा पातळ पदार्थ करवून तो गरीब लोकांस कित्येक महिने पर्यंत वांटविला. शिवाय, इंदूरचे माहाराज होळकर यांजकडून त्या क्षेत्रांत खर्च करण्यास्तव रुपये ५०० आले होते. त्यांचा ही रघुनाथराव यांनीं गरीबगुरिबांचे गुजाऱ्यास्तव उत्तम प्रकारें व्यय केला.

याचसालीं मलिका मुआझमा यांनीं " केसरे हिंद " ह्मणजे हिंदुस्थानची बादशाहीण ही पदवी धारण केली आणि ती हिंदुस्थानांतील दरोबस्त माहाराज, राजे, नबाब, संस्थानिक, सरदार व सर्व साधारण लोक यांस जाहिर करण्यास्तव त्यांचे व्हाइसराय [प्रतिनिधि] व गव्हरनर जनरल लार्ड लिटन साहेब यांनीं संपूर्ण हिंदुस्थानची प्राचीन राजधानी दिल्ली शहर येथें मैदानांत मोठमोठाले तंबू उभे करून त्यांत तारीख १ जान्युआरी सन १८७७ इसवी रोजीं बडा दरबार केला.

त्याचप्रमाणें सदई तारिखेस संपूर्ण हिंदुस्थानचे इंग्रजी राज्यांतील राजधानीचीं शहरें म्हणजे कलकत्ता, मद्रास, मुंबई, आग्रा, लाहोर, कराची, जबलपूर, रंगून, वगैरे शहरांत व प्रत्येक इलाक्यांतील जिल्ह्यांचे शहरांत पोलिटिकल कामगार अगर जिल्ह्याचे कलेक्टर अगर इतर अधिकारी यांनीं आपापले अमलाचे हद्दींतील सरदार, जाहागीरदार, विद्वज्जन, प्रतिष्ठितगृहस्थ वगैरे लोकांस बोलावणीं करून निरनिराळे दरबार केले आणि त्यांत संभाषण करून मलिकामुअज्झमा यांनीं सदई पदवी धारण केल्याचा मजकूर सर्व आबालवृद्धांस जाहीर केला.

दिल्ली येथील दरबारास येण्याविषयीं दक्षिणेंतील व दक्षिण महाराष्ट्र देशांतील कांहीं संस्थानिकांस दुष्काळाचे कारणानें बोलावणीं झालीं नव्हतीं. त्याचप्रमाणें रघुनाथरावआंणासाहेब विंचूरकर यांसही बोलावणें आलें नाहीं. परंतु पुण्याचे एजेंट यांनीं पुण्यास दरबार केला त्यास व नाशीकचे त्या वेळेचे कलेक्टर मि० अर्स्किन यांनीं नाशीक येथें सरकारी वाड्यांत दरबार केला त्यास येण्याविषयीं त्यांस व त्यांचे कनिष्ट बंधू माधवराव दादासाहेब यांस पत्रें आलीं; परंतु एजेंट साहेबांचे पुणें येथील दरबारास न जातां ते उभयतां बंधू पदरचे पुष्कळ मंडळीनिशीं नाशिकास गेले. तेव्हां त्यांचे पेशवाईस प्रिस्काटसाहेब असिस्टेन्ट पोलिस सुपरिंटेन्डन्ट, कलेक्टरचे चिटणीस, नाशीकचे मामलेदार व फौजदार हे नाशीक येथील पोलिसचे स्वार व शिपाई यांनिशीं येऊन त्यांनीं त्यांस बहुमानानें उतरण्याचे वाड्यांत नेऊन पोंहोंचविलें. दुसरे दिवशीं रघुनाथराव व माधवराव हे दरबारचे नेमलेले वेळेस सरकारी वाड्यांत गेले. तेथें नाशिक जिल्ह्यांतील छोटे जाहागीरदार, प्रतिष्ठित गृहस्थ व विद्वज्जन बरेच जमले होते. मि० अर्स्किन साहेब यांनीं उभयतां विंचूरकर बंधूस जमलेल्या समुदायामध्यें अग्रस्थानीं बसविलें. नंतर कांहीं अवकाशानें त्या साहेबांनीं उभें राहून मलिकामुअज्झमा यांनीं "केसरे हिंद"

ची पदवी धारण केल्याबद्दल इंग्रजींत निबंध वाचिला. त्याचें स्पष्टीकरण मराठींत होण्यास्तव त्या वेळेस नाशीकचे मामलेदार रावसाहेब काशीनाथ माहादेव थत्ते यांनीं उभे राहून मराठींत छ-रस संभाषण केलें. नंतर अत्तर, गुलाब व विडे वाटण्यांत ये-ऊन दरबार बरखास्त झाला. या दरबारांत पोलिसचे कांहीं हुद्देदारांस "खानबाहादूर", वगैरे खिताब देण्यांत आले.

मलिकामुआझमा यांनीं सदर्हू पदवी धारण केल्याबद्दल त्यांस मुबारकबादी देण्यास्तव* रघुनाथराव यांनीं राजेबाहादर यांचे बागें-तील बंगल्यांत तारीख ३ माहे जान्युआरी सन १८७७ इसवी रोजीं सायंकाळीं दरबार केला. त्या दरबारास येण्याकरतां मि० आर्स्किन व-गैरे साहेब लोकांस त्यानीं तारीख २ माहे हाल रोजीं विनंतीपत्रें पाठवि-लीं होतीं. सायंकाळीं सदर्हू बंगल्यांत रोषनी करून मराठी दरबारचे वहिवाटीप्रमाणें कळवंतीणीचे ताफ्याचा नाच ही उभा करण्यांत आला होता. तेथें मि० आर्स्किन व त्यांचे असिस्टेंट व जाइन्ट ज्यडज्य व इतर कित्येक साहेबलोक व मडमा येऊन खुर्च्यांवर बसल्या. त्या शिवाय नाशिक येथील कित्येक सभ्य गृहस्थ ही तेथें आले होते. रघुनाथराव आंणासाहेब यांणीं मि० आर्स्किन हे जिल्ह्याचे मुख्य कामगार म्हणून त्यांजपुढें आपले क्लार्काकडून इंग्रजींत छापिलेलें मानपत्र वाचवून नंतर तें आदरपूर्वक त्यांचे हातांत दिलें. मग माधवराव दादासाहेब यांनीं उभे राहून या दरबारचे संबंधानें मराठींत कांहीं मिनिटें संभाषण केलें. नंतर अत्तर, गु-लाब वगैरे वाटण्यांत येऊन दरबार बरखास्त झाला. सर्व सा-हेबलोक व मडमा रघुनाथराव यांचीं रजा घेऊन परत जाण्यास निघाल्या तेव्हां मैदानांत पुष्कळ दारूकाम सोडण्यांत आलें. ते-णेंकरून कांहीं वेळ पर्यंत सर्वांचें मनोरंजन झालें.

रघुनाथराव व माधवराव आपले डेऱ्यास परत आल्यानंतर त्यांस एक दुःखकारक वर्तमान कळलें. तेणेंकरून ते कांहीं

---

* सद्दानंद कळविण्यास्तव.

वेळ स्तब्ध बसले आणि दुसरे दिवशीं ते पदरचे मंडळीनिशीं सावडतोब विंचुरास परत आले. तें वर्तमान असें होतें कीं, त्यांचे बंधू कृष्णराव बापूसाहेब यांची द्वितीय पत्नी सौभाग्यवती बयाबाईसाहेब यांस सातारा येथें नुकतीच देवाज्ञा झाली होती.

सन १८७८ इसवीचे आक्टोबर महिन्यांत रघुनाथराव यांची स्वारी पुण्यांत असतां विंचूर येथें माधवराव दादासाहेब यांची द्वितीय पत्नी सौभाग्यवती सरस्वतीबाईसाहेब यांस देवाज्ञा झाली. या बाई अल्पवयी असून परलोकवासी झाल्यामुळें दादासाहेब यांस किती दुःख झालें असेल त्याचा अजमासच करितां येत नाहीं तथापि त्या बाईस दोन पुत्र व दोन कन्या होत्या त्यामुळें दादासाहेब हे आपले मनास धैर्य देऊन पुढें चिरंजीवांचा प्रपंच जमविण्याची आशा धरून राहिले. त्या दोन पुत्रांचीं नांवें येणेंप्रमाणेंः—

१ गणपतराव आबासाहेब.

२ लक्ष्मणराव आपासाहेब.

सौभाग्यवति सरस्वति बाईसाहेब यांचे हयातींत दादासाहेब यांनीं सन१८७८ इसवींचे फेब्रुवारी महिन्यांत आबासाहेब यांचें मौंजिबंधन केलें होतें, आणि त्या हक्क झाल्यावर सन १८७९ चे मे महिन्यांत इंदूर येथील होळकर माहाराजांचे फडनवीस बळवंतराव यांचे जेष्ट कन्येबरोबर त्यांचा विवाह केला.

पुढें सन१८८१ इसवींचे मार्च महिन्यांत दादासाहेब यांनीं आपले द्वितीय चिरंजीव आपासाहेब यांचें मौंजिबंधन केलें आणि पुढें सन१८८२ चे मेमहिन्यांत इंदूर येथील होळकर माहाराज यांचे नायब दिवाण आंणासाहेब गरूड यांचे नातीबरोबर त्यांचा विवाह केला.

कृष्णरावबापूसाहेब हे अहमदनगर येथें फर्स्टक्लास सेकंड मेडज्यडज्याचे हुद्यावर असतां सन१८७९ सालचे आगष्ट महिन्याचे आखेरीस त्यांचे शरीराचे डावे बाजूस एकाएकी अर्धांगवायु होऊन त्यांची प्रकृति अतीशय बिघडली. त्यां आजारास उप-

चार करण्यास्तव त्यांनीं पुण्यास जाऊन तेथें इंग्रजी डाकटराकडून सतत दोन महिने पर्यंत पुष्कळ उपचार करविले; परंतु आराम न होतां शेवटीं सेपटेंबर महिन्यांत त्यांस देवाज्ञा झाली.

हें खेदकारक वर्तमान रघुनाथराव यांस विंचूर येथें कळतांच ते पुण्यास निघून गेले आणि बापूसाहेबांचे त्रिवर्ग चिरंजीव तेथें होते त्यांचें त्यांनीं पुष्कळ रीतीनें शांतवन करून बापूसाहेब यांची उत्तरक्रिया गोदा तिरीं व्हावी या हेतूनें त्यांनीं त्यांस आपलें इनामगांव सायखेडें येथें आणिलें आणि त्यांजकडून ती उत्तरक्रिया करविल्यानंतर त्यांस विंचूरास नेलें.

मरहूम बापूसाहेब यांची प्रथम लग्नाची स्त्री पंढरपूरकर कानडे सावकार यांची कन्या असून त्या बाईपासून त्यांस तीन पुत्र व दोन कन्या झाल्या. नंतर ती बाई हक्क झाली. त्या पुत्रांचीं नांवें येणें प्रमाणें:—

१ भगवंतराव उर्फ बाळासाहेब.

२ नरसिंगराव उर्फ रावसाहेब.

३ विठ्ठलराव उर्फ नानासाहेब.

या तीन पुत्रांपैकीं वडील पुत्र बाळासाहेब हे सन १८६७ इसवी सालीं नाशीक येथें हक्क झाले. द्वितीय पुत्र रावसाहेब हे हल्लीं निझामाचे मुलकांत बीड येथें अकटींग अव्वल तालुकदार असून त्यांस दरमाहा रुपये ६०० प्रमाणें पगार मिळत आहे. तिसरे पुत्र नानासाहेब हे तीन दिवसांचे वयाचे असतां त्यांची मातुश्री निवर्तली. नंतर रघुनाथराव यानीं त्यांचें पालन पोषण करून त्यांस वाढविलें आणि त्यांचें मौंजिबंधन करून लग्नही करून दिलें. पुढें ते रघुनाथराव यांजपासून निघून आपले बंधू रावसाहेब यांजकडे रोजगार मिळविण्याचे इराद्यानें गेले; परंतु त्यांस नशीबाची अनकुलता नसल्यामुळें ते अद्यापपर्यंत बेकारच आहेत.

बापूसाहेब यांचें पहिलें कुटुंब निवर्तल्यावर त्यांनीं दुसरा विवाह पंढरपूर येथील जवळेकर आडनांवाचे गृहस्थ यांचे कन्येबरोबर

केला. या बाईपासून त्यांस एक पुत्र झाला. त्यास रामराव उर्फ बाळासाहेब असें ह्मणतात. बाळासाहेब यांचें वय सुमारें १७ वर्षांचें असून हाल्लीं ते पुणें येथें विद्याभ्यास करीत आहेत. बापूसाहेब यांची ही पत्नि निवर्तल्याचा मजकूर आम्ही वर लिहिलाच आहे.

सन १८८१ इसवी सालीं इंदूरचे माहाराज होळकर यांचें विंचूर येथें पुनरागमन. सन १८७३ इसवीचे दिसेंबर महिन्यांत माहाराज तुकोजीराव होळकर यांची स्वारी विंचूर येथें आल्यानें विंचूरकर व होळकर यांच्या घराण्यांमधील मजित झालेला स्नेहसंबंध पुनः नूतन झाला असें आम्ही वर लिहिलेंच आहे. पुढें सन १८८१ इ० चे जान्युआरी महिन्यांत होळकर माहाराजांची स्वारी जेजुरी वगैरे देवस्थानांचे यात्रेकरितां दक्षिणेंत येण्यास निघाली तेव्हां त्यांनीं रघुनाथरावअंणासाहेब यांस आपला विंचुरास भेटीस येण्याचा मानस कळविला. तेणें करून रघुनाथराव यांस आनंद होऊन त्यांनीं आपले कनिष्ट बंधू माधवराव दादासाहेब यांस माहाराजांस सामोरें म्हणून दोनप्रहरीं मनमाडास पाठवून दिलें. तेथें तिसरे प्रहरीं स्पेशलट्रेनीनें माहाराजांची स्वारी येऊन उतरल्यावर दादासाहेब यांनीं त्यांची भेट घेऊन "मी आपल्यास विंचुरास नेण्याकरितां आलों आहें" असें त्यांस कळविलें. माहाराजांनी दादासाहेब यांची खातरकरून त्यांस असें सांगितलें कीं, "विंचूर हें आम्हांस परस्थल असें वाटत नसून अंणासाहेब यांचे भेटीकरितां तेथें आमची येण्याची तयारी आहेच. याकरितां तुम्ही विंचुरास परत जावें. आम्ही मागाहून येतच आहों." मग दादासाहेब यांनीं विंचुरास परत येऊन माहाराजांचे सत्काराची सर्व प्रकारें तयारी करविली. अस्तमानचे सुमारास विंचूरचे वाड्यांत माहाराजांची स्वारी जवळ आल्याची खबर आली. त्यावेळेस रघुनाथराव हे अग्निहोत्राचा सायंकाळचा होम देत होते. सबब दादासाहेब यांनीं माहाराजांस सामोरें जाऊन मोठ्या आदरानें त्यांस वा-

ड्यांत आणिलें. कांहीं अवकाशानें माहाराजांनीं होमशाळेचे द्वारापुढें रघुनाथराव यांची भेट घेतली तेव्हां शिष्टसांप्रदायाप्रमाणें कांहीं वेळ परस्परें भाषण झालें. त्याचप्रमाणें राणीसाहेब यांची स्वारी घेऊन पोहोंचतांच श्रीमंत सौभाग्यवती जानकीबाईसाहेब विंचूरकर यांनीं त्यांस वाड्याचे दरवाज्यापर्यंत सामोरी जाऊन त्यांचे राहण्याकरितां जी माडी नेमिलेली होती तेथें त्यांस पोहोंचविलें.

दुसरे दिवशीं अंगासाहेब यांनीं माहाराजांस मेजवानी केली. माहाराजांनीं विंचुरापासून पांच कोसांवर आपले जन्मभूमीचें गांव करंजी येथें एक नवीन इमारत तयार करविली असून ती पाहाण्याकरितां त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं त्यांची स्वारी निघाली, आणि विंचुरास परत न येतां परभारें निफाड गांवावरून चांदवडास जाणार होती सबब अंगासाहेब यांनीं त्यांस व त्यांचे कनिष्ट चिरंजीव जे त्यांजबरोबर होते त्यांस पोषाग देण्यास आणविले; परंतु " आम्ही परस्थळीं आलों नसून केवळ प्रेम भावानें आपल्यास भेटण्यास्तव मुद्दाम आलों आहों, सबब पोषागांची जरूर नाहीं. " असें माहाराजानीं त्यांस सांगून ते पोषाग स्विकारिले नाहींत. तथापि " आपले प्रेमाचे आगमनाचें स्मरण राहाण्यास्तव आपण आमचे हातांनीं कांहीं तरी स्विकारिलेंच पाहिजे. " असें अंगासाहेब यांनीं बोलून मोठ्या आदरानें माहाराजांस आपले पागेंतील एक उत्तम घोडा नजर केला. तो माहाराजांनीं अंगासाहेब यांची मर्जी न मोडावी म्हणून स्विकारिला. नंतर माहाराजांची स्वारी करंजीस गेली.

पुढें दोन दिवसांनीं माहाराजांचे जेष्ट चिरंजीव बाळासाहेब यांची स्वारी करंजीस जाण्याकरितां लासलगांव स्टेशनावर आली. तेव्हां अंगासाहेब यांनीं आपले कनिष्टबंधू दादासाहेब यांस स्टेशनावर पाठवून त्यांस बहुमानानें आपले विंचूर येथील वाड्यांत आणिलें. एक दोन दि-

असांनीं ते करंजीस जाऊन विंचुरास परत आल्यावर इंदुरास जाण्यास तयार झाले, तेव्हां अंणासाहेब यांनीं त्यांस उंची पोषाग देऊन शिष्टसांप्रदायाप्रमाणें विदा करून दिलें.

सन १८८० इसवीचे फेब्रुआरी महिन्यांत [माघ शुद्ध १३ या दिवशीं] रघुनाथराव अंणासाहेब यांनीं अग्निहोत्र ग्रहण करून पुढें एकवर्ष पर्यंत विंचूर ग्रामाचें सीमोल्लंघन न करितां आपले राहाते वाड्यांत सतत अग्न्यार्चन केलेंहोतें. होळकर माहाराजांची स्वारी विंचुरास येऊन गेल्यानंतर दोन महिन्यांनीं त्यांस आपले नरसिंहपूर येथील कुलस्वामीचे सन्निध कांहीं कालपर्यंत क्षेत्रवास कर्ण्याची इच्छा उत्पन्न झाल्यावरून, सन १८८१ इसवीचे एप्रिल महिन्यांत ते विंचुराहून निघून पायमार्गानें होत्राचे अग्नीसह नरसिंहपुरास गेले. तेथें अग्न्यार्चन व श्री नरहरीचें पूजन करून कालक्षेप करीत असतां, सुमारें एक महिन्यानंतर म्हणजे मे महिन्यांत त्यांची पत्नी श्रीमंत सौभाग्यवती जानकीबाई साहेब यांची प्रकृती कफक्षयानें एकाएकीं बिघडून त्या आजारी पडल्या. त्यांस आराम व्हावा म्हणून रघुनाथरावअंणासाहेब यांनीं पुणें व पंढरपूर येथून चांगले प्रवीण वैद्य आणवून उत्तम प्रकारें औषधोपचार करविले; परंतु बाईसाहेब यांस बिलकुल आराम न होतां त्यांची प्रकृती दिवसानदिवस अधिकाधीक बिघडत जाऊन शेवटीं जूनमहिन्यांत त्या पुण्यश्लोक बाईस देवाज्ञा झाली. अंणासाहेब यांस त्या स्त्रीपासून पुत्रसंतान झालें नव्हतें. तत्रापि, बाईचें वय वृद्ध झालें नसल्याकारणानें अद्यापिही आपल्यांस पुत्रसंतती होईल अशी त्यांस आशा वाटत होती. परंतु दुर्दैवेंकरून बाईचा देहांत झाल्यामुळें ती आशा अगदीं नष्ट होऊन त्यांचे प्रपंचास मोठा धक्का बसला. शिवाय, त्यांचें अग्निहोत्र ही विच्छिन्न झालें.

वर लिहिलेला विपरीतप्रकार घडल्यामुळें अंणासाहेब यांचे आप्तवर्ग, इष्टमित्र व पदरचे लोक यांस अत्यंत दुःख झालें. अं-

णासाहेब यांस किती दुःख झालें असेल त्याचा तर अजमासच करितां येत नाहीं. सारांष, बाईंचा देहांत झाल्यावेळेपासून त्यांचें मन प्रपंचांतून अगदीं उठलें, आणि इतर कांहींच न करितां आपले संस्थानची वहिवाट आपले कनिष्ट बंधू माधवरावदादासाहेब यांचे स्वाधीन करावी, आणि क्षेत्रवास करून आपले आयुष्याचे शेष राहिलेले दिवस तेथें स्नानसंध्येंतच घालवावे असा त्यांनीं निश्चय केला. त्यावेळेपासून त्यांचें कायमचें राहाणें नरसिंहपूर येथेंच आहे. ते जरी कधीं कधीं कारणपरत्वें विंचुरास येतात तरी तेथें पंधरा दिवसांपेक्षां अधिक दिवस मुक्काम न करितां नरसिंहपुरास परत जातात.

रघुनाथराव यांचें मन प्रपंचांतून उठण्यास अणखी एक विशेष कारण झालें, त्या संबंधाची हकीकत आम्ही पुढें लिहितों.

सन १८१८ इसवी सालीं पेशव्यांचें राज्य नष्ट होऊन दक्षिणेंत कंपनी सरकारचा अंमल झाल्यावर नवीन काबीज केलेल्या मुलकांचा बंदोबस्त करण्याचा मुख्य अधिकार आनरेबल मौंटस्टुअर्ट एलफिस्टन्साहेब यांजकडे येऊन त्यांस "सोलकमिशनर" (म्हणजे कुलकामगार) असें नांव प्राप्त झालें. या साहेबांनीं पेशव्यांचे दरोबस्त लष्करी सरदारांचे उत्पन्नांच्या चौकशा करून ठराव केले त्यावेळेस त्यांनीं विंचूरचे चीफ विठ्ठलरावतात्यासाहेब विंचूरकर [रघुनाथराव यांचे वडील] यांचे ही दरोबस्त उत्पन्नांची चौकशी करून त्यांचा सालिना अजमासें बारा लाख रुपयांचे आकाराचा दरोबस्त लष्करी सरंजाम लागलाच खालसा केला. परंतु त्या शिवाय त्यांचा सालिना आजमासें ५०००० रुपयांचे आकाराचा जात सरंजाम होता तो त्यांजकडे सदोदीत चालविण्याविषयीं सरजान मालकम् यांनीं पेशव्यांबरोबर चाललेलें युद्ध समाप्त होण्यापूर्वी त्यांस वचन दिलें असून तें त्यांनीं आपले तारीख ५ जून व तारीख २६ जूलई सन १८१८ इसवीचे पत्रांत आपल्यांस [सोल कमीशनर यांस] कळविलें होतें. सबब तेवढा

मात्र त्यांचे घराण्याचे गुजाऱ्याकरितां त्यांजकडे वंशपरंपरेनें चालवावा असा त्यांनीं ठराव करून त्यांचे (विठ्ठलरावतात्यासाहेब यांचे] ताब्यांत दिला; आणि सन १८१९ इसवी सालीं त्यांनीं [सोल कमीशनर यांनीं] इंडियाचे गव्हरनर जनरल यांस एकंदर सरंजामपट पाठविला त्यांत विंचूरकर मौसूफ यांचे नांवाचे पत्रकांतील शेंवटचे कोष्टकांत त्यांचा सरंजाम वंशपरंपरेनें चालावयाचा असा शेरा लिहिला. सदर्हू एकंदर सरंजामपट गव्हरनर जनरल यांनीं मंजूर केल्यावरून सोलकमीशनर यांनीं सदर्हू सरंजाम वंशपरंपरेनें चालविण्याचे बाबदींत केलेला ठराव कायम झाला. आनरेबल मौंटस्टुअर्ट एलफिन्स्टनसाहेब हे दक्षिणेंत इंग्रज सरकारचे राज्याचा मजबूत पाया घालणारे असून सदर्हू बंदोबस्ताचे कामीं पूर्ण अधिकारी होते आणि त्यांस पेशव्यांचे प्रत्येक पिढीजादे सरदाराचे योग्यतेची पुरी माहितगारी होती याकारणानें त्यांनीं जे ठराव केले ते आखेरचे आहेत असें पुढील अधिकारी मानू लागले. सबब त्यासाहेबांनीं विंचूरकर यांचे जातसरंजामाचे बाबदींत जो ठराव पूर्ण माहितीनें व विचारपूर्वक केलाहोता त्याबद्दल पुनः चौकशी करण्याचें कारण राहिले नव्हतें. तथापि पुढें अठरा वीस वर्षांनीं कंपनी सरकारची मुळची राज्यरिती बदलली असें दिसतें, कारण आनरेबल एलफिन्स्टनसाहेब यांनीं अव्वल इंग्रजीस जे ठराव केले होते त्यामुळें दक्षिणेंतील सरदार लोकांचे हातांत पुष्कळ मुलुक राहिला होता असें त्या सरकारचे मुख्य अधिकारी यांस वाटल्यावरून त्यांनीं सन १८३९ इसवी सालीं आनरेबल एलफिन्स्टनसाहेब यांजपासून पुढें लिहिल्याप्रमाणें लेख लिहून घेतला.

"दिल्लीचे बादशाहा व सातारचे राजे यांनीं प्रत्यक्ष दिलेले किंवा मंजूर केलेले सरंजाम मात्र वंशपरंपरेनें चालवावे. बाकी जे सरंजाम इतर अधिकाऱ्यांनीं म्हणजे पेशवे वगैरेनीं दिले असतील ते सरकारचे मर्जी प्रमाणें चालवावे."

यावरून असें दिसतें कीं आनरेबल मिस्तर एलफिन्स्टनसाहेब यांनीं पुर्वीं सन १८१८ इसवी सालीं दक्षिणेंतील सरंजामांचे बाबदीत ठराव केले होते ते केवळ त्या प्रांतांतील सरदार लोकांचीं मनें तूर्त संतुष्ट करण्यास्तव केलेले असून पुढें फिरविले जाण्यास पात्र होते किंवा कंपनीं सरकारचे लंडन शहरांतील मुख्य कोर्टानें तो लेख एलफिन्स्टन साहेबांपासून सक्तीनें लिहून घेतला असावा, किंवा आतां आपण स्वदेशास आलों तेव्हां आपल्यास दक्षिणेंतील सरदारांची काय जरूर आहे ? असें त्या साहेबांस वाटून त्यांनीं तो दिला असावा.

एलफिन्स्टन साहेबांस आपले आयुष्याचे शेवटचे दिवसांत तो लेख लिहून देण्यास वरलिहिलेलींच कारणें झालीं असतील किंवा इतर झालीं असतील तें बरोबर कळत नाहीं; पण त्या लेखामुळें पुढें दक्षिणेंतील शेंकडों सरदार लोकांची नुकसानें झालीं एवढें मात्र ढळढळीत दिसत आहे.

पुढें सन १८४२ इसवी सालीं कंपनी सरकारचें वर लिहिलेले मुख्य अधिकाऱ्यांनीं सदर्हू सरंजामांच्या चौकशा करण्यास्तव तीन मुख्य रूल (कानू) मुंबई सरकाराकडे पाठवून दिले, ते त्या सरकारानें पुणें येथील त्यावेळचे आपले एजेंट मिस्तर जान वार्डन यांजकडे अमलांत आणण्यास्तव रवाना केले.

सदर्हू तीन कानूंतील शर्ती येणेंप्रमाणेः—

१ सन १७५० इसवी सालीं सातारचे शेवटचे राजे शाहूमाहाराज यांचा देहांत झाल्यावर दक्षिणेंत बाळाजी बाजीराव पेशवे हे मुख्य राज्याधिकारी झाले सबब सन १७५१ इसवी साला पूर्वी दिलेले सरंजाम लष्करी नसतील तर तेव्हडे मात्र वंशपरंपरेनें चालवावें.

२ सन १७५१ इसवी सालापासून सन १७९६ इ० पावेतों म्हणजे माधवराव नारायण पेशवे यांचे अंतकाळापर्यंत जे सरंजाम देण्यांत आले ते अडीच पुष्त चालवावे म्हणजे दोन पुष्त

चालवून तिसरे पुष्ताचे पुरुषास त्याचे वडिलार्जित सरंजामाचे वार्षिक उत्पन्नाचे निम्मे आकारा इतकें पेनशन ताहयात करून द्यावें.

३ सन १७९६ इसवीपासून सन १८१८ इ० पर्यंत जे सरंजाम देण्यांत आले ते म्हणजे शेवटचे पेशवे बाजीराव रघुनाथ यांनीं दिलेले सरंजाम दीड पुष्त चालवावे, म्हणजे ते पहिल्या पुष्ताचे पुरुषास चालवून दुसऱ्या पुष्ताचे पुरुषास त्या सरंजामाचे निम्मे आकारा इतके पेनशन ताहायत करून द्यावें.

हे रूल (कानू) करण्यास कंपनी सरकारचे मर्जी शिवाय किंवा आनरेबल मिस्तर एलफिन्स्टन साहेबांचे वर लिहिलेले लेखा शिवाय दुसरा कोणताच आधार दिसत नाहीं, कारण, जो राज्याधिकारी कोणती एकादी देहेनगी देतो ती तो आपले राज्याचा कुलमालिक असतां त्यांनें दिली असली तर ती पुढील राज्याधिकाऱ्यानें पूर्ववत चालविणें यथान्याय आहे: ती एक किंवा दोन किंवा अडीच पुष्त चालविण्याचा नियम करून देण्यास पुढील राज्याधिकाऱ्याची मर्जी किंवा त्यानें मनमानेल तसा केलेला कानू यांशिवाय दुसरा आधार दिसत नाहीं. परंतु पेशव्यांचे पदरचे लष्करी सरदार हाल्लीं इंग्रज सरकारची रयत झाले आहेत सबब इंग्रज लोकांनीं केलेले कायदे व कानू कसेही असले तरी, राजानें मारिलें व पावसानें भिजविलें याची दाद सर्व शक्तीमान जगनियंत्या शिवाय कोणापाशींही लागावयाची नाहीं अशी वृद्धांची म्हण आहे, ती सत्य मानून आपली स्थिती सुधारण्याविषयीं अनंन्यभावेंकरून त्या नियंत्याचीच प्रार्थना करीत असावें एवढा मात्र तरुणोपाय दिसतो तो सर्वांनी करून स्वस्थ बसावें. असो.

वर लिहिलेल्या रुलांचे (कानूंचे) आधारानें पुढें एजेंटमौसूफ यानीं सदर्हू सरंजामांबद्दल चौकशा केल्या आणि एक सरंजामपट तयार करून तो मुंबई सरकाराकडे पाठवून दिला. ह्या सरंजामपट कंपनी सरकारचे लंडन शहरांतील मुख्य कोर्टानें ना-

पसंद केल्यावरून त्याबद्दल पूनः पुनः चौकशा झाल्या. रघुनाथराव यांजकडे जो जात सरंजाम हाल्लीं चालत आहे तो सदोदित चालविण्याविषयीं पूर्वी सरजान मालकम् यांचे वचन मिळालें असून मुख्यत्वेंकरून त्याच वचनाचे आधारानें तो वंशपरंपरेनें चालवावा ह्मणोन आनरेबल मौंटस्टुअर्ट एलफिनस्टनसाहेब यांनीं ठराव केलाहोता सबब त्या संबंधाचे दरोबस्त कागदपत्र मुंबई सरकाराकडून सन १८४९ इ० सालीं कंपनी सरकारचे वर लिहिलेले मुख्य कोर्टापुढें गेले. ते पाहिल्यावर तो दरोबस्त सरंजाम सदोदीत चालविण्याजोगा असण्याविषयीं त्या कोर्टाची खात्री झाली. (त्या कोर्टाकडून मुंबई सरकारास तारीख२२माहे मे सन १८४९ इसवीचें पत्र आलें तें पाहावें.) तत्रापि, सरजान् मालकम् यांचे वचनाची शाबिती कर्ण्याचा बोझ्या त्या कोर्टानें रघुनाथराव यांचे शिरावर ठेविला. [सदर्हू वचन सरजान मालकम् यांनीं वर लिहिल्याप्रमाणें विठ्ठलरावतात्यासाहेब (रघुनाथराव यांचे वडील) यांस तोंडीं देऊन फक्त आनरेबल मौंटस्टुअर्ट एलफिनस्टन यांस आपले तारीख ५ माहे जून व तारीख २६ जुलई सन १८१८ इसवीचे पत्रांनीं कळविले होतें.] पैकीं तारीख २६ जुलईचे पत्रांत त्या साहेबांनीं एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, " मी विंचूरकर यांस जें वचन दिलें तें माझे मत्तें लेखीं वचना इतकें मजबूत असून लेखीं वचनाप्रमाणेंच इंग्रजसरकारचा विश्वास गुंतविणारे आहे असे मला मानणे भाग आहे. " त्याच पत्रांत दुसरे ठिकाणीं असें लिहिलें आहे की, " पेशवे शरण आल्यावर ही त्यांचे मदतीची गरज नाहीशी झाली नाहीं. पेशव्याचे फौजेची दाणादाण करण्यास व त्यांचे बदललेले स्थितीस त्यांचे मन राजी करण्यास त्यांची [विंचूरकर यांची] मदत अवश्य पाहिजेहोती व ती त्यांनीं हमेषा मोकळे मनानें दिली. "

सदर्हू वचनाची शाबिती कर्ण्यास सरकारचे रिकार्डांतील दाखल्यांशिवाय दुसरें कांहींच साधन नव्हतें सबब ती शाबिती कर्णें

त्यावेळेस रघुनाथराव यांजकडून घडलें नाहीं. सबब इंग्रज सरकारचे मेहेरबानगीचें एककृत्य म्हणून सद्दहू जातसरंजाम रघुनाथराव यांचे ताहयात चालवून त्यांचे पश्चात त्याचा निम्मे भाग त्यांचे वारिशाकडे चालवावा ह्मणून त्या कोर्टाने सन १८५२ इसवी साली ठराव करून तो मुंबई सरकारास लिहून कळविला व त्या सरकाराने आपले पुणे येथील एजेंटाचे मार्फत रघुनाथराव यांस त्या ठरावाची समज दिली.

पुढें रघुनाथराव यांनीं सद्दहू वचनाची शाबिती करण्यास जो पुरावा पाहिजे होता तो मिळविण्याचा उद्योग चालविला. शेवटीं सन १८५६ इसवी सालीं पुणें येथील त्यावेळचे एजेंट मिस्तर लिजेट यांस त्यांनीं तोंडी विनंती करून सरकारचें इंग्रजी दफ्तर पाहाण्याची परवानगी मिळविली. नंतर त्यांनीं इंग्रजी जाणणाऱ्या एका मनुष्याकडून कितीएक दिवस त्या दफ्तरांतील कांहीं कागद वाचून पाहविले. शेवटी त्यांस सद्दहू सरंजामासंबंधीं कांहीं कागद आढळले, त्यांत सरंजान मालकम् यांची वर लिहिलेलीं दोनपत्रें व आनरेबल मिस्तर एलफिन्स्टन यांचे सरंजामपटांतील सद्दहू सरंजामापुर्ता दाखला वगैरे दाखले होते. त्या दाखल्यांच्या नकला सहीनिशीं आपल्यास देण्याविषयीं रघुनाथराव यांनी एजेंटमौसूफ यांस विनंती केली; परंतु त्यांनीं ती नाकबूल करून बिनसहीच्या नकला करून घेण्याची मात्र परवानगी दिली. त्या प्रमाणें रघुनाथराव यांनीं त्या नकला घेतल्यामुळें त्यांजपाशीं सद्दहू वचनाची शाबिती करण्यापुर्ता मजबूत पुरावा झाला.

कंपनीचें हिंदुस्थानांतील राज्य मलिकामाआझमा यांचे कबजांत जाण्या पूर्वी कोणते हिराजास किंवा संस्थानिकास आपले राज्याचा किंवा संस्थानाचा वारिस कर्ण्यास्तव दत्तक घेण्याची परवानगी देऊनये आसा कंपनीसरकाराने एक नियमकरून ठेविलाहोता. त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत झाशी व जालवण आणि दक्षिणेंत सातारा वनागपूर येथीलराज्यें व पटवर्धन यांची कांहीं संस्थाने व त्यांच

प्रमाणें कित्येक जाहागिरी रघुनाथराव यांच्या डोळ्यासमूर-खालसाझाल्या शिवाय इनाम कमिशनर यांचे ठरावा मुळें पुर्वी बहुत दिवस चाललेलीं कित्येक इनामे सुध्धां तेडे वारसांचे हरकती मुळें खालसा झाल्यानें संपूर्ण दाक्षिणभर मोठा गवगवा झाला होता. तो बिकट प्रसंग व त्यावेळचे राजनितीची चालू स्थिती पाहून रघुनाथराव यांचे अंतःकर्ण अगदीं चकीत झालें, आणि त्यांस असें वाटूं लागलें कीं कदांचित दुर्दैवेंकरून आपल्यास पुत्रसंतती न झालीतर आपलें संस्थान कंपनी सरकार खचीतच खालसा करील.त्यावेळेस त्यांचे वयास ३३वें वर्ष असून त्यांची संतान होण्याची उमेद खचलीनव्हती. तत्रापिही त्यांनीं फार दूर दृष्टी पोंहोंच-वून, आपल्यास पुत्र न होतां कदांचित आपला देहांत झाला तर आपलें संस्थान आपले कनिष्ट बंधूचे पुत्रसंततीकडे वंशपरंपरेनें चालवावें म्हणून त्यांनीं सन १८५५ इसवी सालीं मुंबई सरकारास अर्ज केला. त्याजवर इनाम कमिटींत पत्रव्यवहार होऊन शेवटीं कंपनी सरकारचे वरलिहिलेले मुख्य कोर्टाचे मंजुरीनें त्यांचे विनंती प्रमाणें करण्याविषयीं ठराव झाला. पुढें सन १८५७ इसवी सालीं उत्तर हिंदुस्थानांत लष्करी दंगा माजला, त्यामुळें अशा प्रकारचे सर्व व्यवहार, म्हणजे निपुत्रीक संस्थानि-कांचीं संस्थानें व जाहागिरी खालसा करण्याचा क्रम बंद पडला. पुढें सन १८५९ इसवीचे आखेरीस मलिकामाअझमा यांनीं कंपनी सरकारचे हिंदुस्थानांतलि राज्याचा कबज्या घेतल्यावर सन१८६१ इसवी सालीं हिंदुस्थानचे त्या वेळचे गव्हरनर जनरल लार्ड क्यानिंग यांचे सिफारिषी वरून हिंदुस्थानांतील दरोबस्त नेटीव राजे व संस्थानिक यांस आपले शास्त्रा प्रमाणें आपली राज्यें व संस्थानें यांकरितां द-त्तक घेण्याच्या एकदम सनदा करूनद्याव्या असा मलिकामाआझमा यांचे सरकारानें एकसां हुकूम सादर केला. त्या हुकुमा बर-हुकूम आपल्यास दत्तक घेण्यास हरकत राहिली नाहीं असें रघु-नाथराव यांस वाटून सन १८५६ इसवीं सालीं मिळविलेल्या

पुराव्याचे आधारानें प्रथम आपला दरोबस्त सरंजाम आपल्याकडे वंशपरंपरेनें चालविण्याविषयीं रघुनाथराव यांनीं सन १८६५ इसवी सालीं मलिकामाअझ्मा यांचे सरकारचे मुख्य सेक्रेटरी यांस अर्ज केला; परंतु पूर्वी सन १८५२ इसवी सालीं माजी कंपनी सरकारचे वर लिहिलेल्या कोर्टानें त्यांचा फक्त निम्मेच सरंजाम वंशपरंपरेनें चालविण्याविषयीं ठराव करून त्या प्रकरणाचा निकाल लावीला होता, सबब त्या प्रकरणाची पुनः चौकशी करण्याचें कारण नाहीं असें त्या थोर अधिकाऱ्यास वाटून त्यानें तो त्यांचा अर्ज नामंजूर केला.

तथापि रघुनाथराव यांनीं आपले विनंतीस अधीक मजबूती येण्यास्तव सन १८५६ इसवी सालीं मिळविलेल्या पुराव्या खेरीज सन १८७३ इसवी सालीं अणखी दस्ताऐवजी पुरावा मिळविला. हा पुरावा सन १७५० इसवी सालीं त्यांचे निपणजे व सदर्हू सरंजामाचे मुळ संपादक विठ्ठल शिवदेव यांचे हातांत सालिना सुमारें ऐंशी हजार रुपयांचे उत्पन्नाचा मुलुक असून शिवाय त्या सालीं त्यांस स्वतःचे वार्षिक तैनातीबद्दल पन्नास हजार रुपये मिळाले असें दाखविणारा होता. तों पर्यंत ही रघुनाथराव यांस पुत्रसंतान झालें नाहीं. आणि त्या पुढें ही नझालें तर त्यांचें देहांतानंतर त्यांचें संस्थान व त्यांचें नांव चालविण्यास त्याचे देहाचा सिधा वारिस म्हणून कोणीच राहाणार नाहीं. याकरितां आपले उभयतां बंधूंचे पुत्रां पैकीं एक पुत्र सरकारचे परवानगीनें दत्तक घेऊन त्याचे नावानें आपलें सांप्रतचें दरोबस्त संस्थान आपले पश्चात वंशपरंपरेनें चालेल असा बंदोबस्त आपले हयातींत करून ठेवणें हें त्यांचे जन्मांतील शेवटचें कर्तव्यकर्म होतें. सबब त्यांनीं तारीख १७ माहे डिसेंबर सन १८७७ इसवी रोजीं मलिकामाअझमा यांचे सरकारचे हिंदुस्थानाबद्दलचे मुख्य सेक्रेटरी यांस मुंबई सरकारचे मार्फत तफसीलवार अर्ज करून त्यांत आपल्यास दत्तक घेण्यास्तव सनद मिळावी आणि

जो दत्तक आपण घेतील त्याजकडे आपला सांप्रतचा दरोबस्त सरंजाम वंशपरंपरेनें चालवावा अशा दोन विनंत्या केल्या. हा अर्ज तफसीलवार होता यामुळें त्यांत वर लिहिलेला दरोबस्त पुरावा दाखल केलेला असून पेशवाई अमलांत त्यांचे (रघुनाथ राव यांचे) पुर्वज किती थोरपदवीचे लष्करी सरदार होते व त्यांनीं काय पराक्रम केले होते व इंग्रज सरकारचे जनरल त्यांस किती मानीतहोते हें दाखविण्यास्तव इंग्रज कामगारांचे पत्रव्यवहारांतील अनेक उतारे व त्याचप्रमाणें आपले घराण्याचा संक्षिप्त इतिहास येणेंप्रमाणें विचाराकरितां विनयपूर्वक पुढें केलेलें होतें. या शिवाय रघुनाथराव यांनीं रावबाहादूर गोपाळरावहरीदेशमुख यांचे मार्फत आपले कनिष्ट बंधु कृष्णरावबापुसाहेब यांस असें कळविलें कीं, " मला जो दत्तक घ्यावयाचाआहे तो मीं तुमचे पुत्रां पैकींच घेईन, याकरितां सांप्रतचें दरोबस्त संस्थान पुढें वंशपरंपरेनें चालण्यास्तव मीं जो उद्योग चालविला आहे त्यांत तुम्हीं माझे विरुद्ध वर्तन करूंनये, कारण, तसें तुम्हीं वर्तन करण्यासारिखें मी पूर्वीं तुम्हां बरोबर वर्तन केलेंनाहीं. तुम्ही उभयतां बंधूंनीं इतकेंच करावें कीं मीं केलेल्या अर्जाबद्दल आपली राजीरजामंदी सरकारास कळवावी. हें नहोईल तर माझे अर्जावर तक्रारअर्ज तरी करूंनका." परंतु रघुनाथराव यांच्यावर लिहिलेल्या म्हणण्याकडे कृष्णरावबापूसाहेब यानीं बिलकूल लक्ष न देतां आपले कनिष्ट बंधू माधवरावदादासाहेब यांस आपले बेतांत सामील करून घेतलें. नंतर लौकरच उभयतां बंधूंनीं सन १८७८ इसवींचे फेब्रुआरी महिन्यांत रघुनाथराव यांचे वरलिहिलेले अर्जावर तक्रारअर्ज सरकाराकडे गुजराविला. त्यांत मुख्य विनंती अशीहोती कीं, आम्हांउभयतां अर्जदारांचे वंशाकडे हाल्लींचे संरजामाचा निम्मे भाग चालविण्याविषयीं सन १८६६ इसवी सालीं जो ठराव झालाआहे त्यांत फेरफार होऊंनये. असें वर्तन करणें उभयतां बंधूंस अगदीं

अनुचित होते, कारण, सुदैवें करून दरोबस्त सरंजाम चालविण्याविषयीं ठराव झालाअसतातर विंचूरसंस्थानांतील सर्व लोकांचें, विशेषेंकरून उभयतां तक्रारअर्जकरणाऱ्याबंधूंचे निःसंशय हीत झालें असतें. या उभयतां बधूंनीं सन १८४५ इसवी सालापासून हरएक विशेषप्रसंगीं आपले वडीलबंधू व विंचूरसंस्थानचे मालिक यांचे इच्छेनुसारच वर्तन केल्याचीं उदाहरणे आढळतात. असेंअसतां, यामहत्प्रसंगीं त्यांजकडून त्यांचे इच्छेविरुद्ध वर्तन झालें हें त्या संस्थानांतील सर्व लोकांचें दुर्दैवच होय असें ह्मणण्यास हरकत दिसतनाहीं. शेवटीं, उभयतांबंधूंचे तक्रारअर्जामुळें किंवा दुसरेकांहीं कारणामुळें, मलिकामाआझमा यांचे सरकारानें, रघुनाथराव यांनीं आपले तारीख १७ माहे डिसेंबर सन १८७७ इसवीचे अर्जांत दाखल केलेल्या दस्ताऐवजी पुराव्याकडे लक्ष नपुरवितां पूर्वीं सन १८६६ इसवी सालीं झालेला ठराव आखेरचाआहे असा त्या अर्जाचा जबाब मुंबई सरकाराकडे पाठविला आणि मुंबई सरकारानें तो आपले ताब्यांतील मध्यभागाचे कमिशनर यांचेमार्फत त्यांस सन १८७९ इसवीचे जुलई महिन्यांत कळविला. त्यामुळें आपण इतके झटून केलेले सर्व परिश्रम निर्फळ होऊन आपलें संस्थान पुढें आपले देहाचे वारिसाकडे नचालतां आपले देहांताबरोबर सरकार त्यांचानिम्मेभाग अन्यायानें खालसा करणार असें त्यांस वाटलें; आणि त्यावाटण्यांत प्रपंच्यांतील नाउमेदीचीं इतरकारणें हीं सामील झालीं असतां, प्रापंच्यांत बिलकूल सुख नसून तो सर्व दुःखाचें कारण आहे असें त्यांचे मनांत पक्कें ठसलें.

याप्रमाणें आम्ही यथामती विंचूरकर यांचे घराण्याचा इतिहास तयारकरून सांप्रतकाळापर्यंत आणून पोंहोंचविला आहे. हा पुराकरण्यांत आह्मी आपल्या तर्फेंने याघराण्याकरितां दोन ओळी पुढें लिहितों.

पेशवाई अमलांत हें घराणें पुरातन सरदारलोकांचे घराण्यांमध्यें मोठें नामांकित असून याचें एकंदर वार्षीक उत्पन्न सरासरी वीस लाख रुपयां इतकें होतें आणि याचे हाताखालचे स्वारांची कायमची संख्या पांचहजारां पेक्षां कमी नव्हती. असेंअसतां या जगांतील इतर क्षणभंगुर गोष्टींप्रमाणें कालक्रमेंकरून याचे मुख्याचे हाताखालची दरोबस्त फौज गेली व त्यामानानें याचें उत्पन्न ही कमी होऊन हाल्लीं सालीना सरासरी साठ हजार रुपयांचें राहिलें आहे. * तेव्हडयानें सुद्धां याघराण्याच्या मुळच्या महत्वाचें कांहींसें चिन्ह राहिलें आहे; परंतु याघराण्याचे सांप्रतचे चीफ (मुख्य मालिक) रघुनाथरावअंणासाहेब यांचे पश्चात या घराण्याचा निम्मे भाग सरकारखालसा करून बाकीचा निम्मेभाग मात्र पुढें वंशपरंपरेनें चालवावा असा केसरे-हिंद यांचे सरकारानें पूर्वींच ठराव करूनठेविलाआहे. शिवाय, पुढें चालणाऱ्या निम्मे भागाच्या सरंजामांत ही दोन वांटण्या होणार आहेत असें कळून येतें. असें झालें असतां संस्थान ह्मणून मुळींच न राहातां जसे कोणी सामान्य किरकोळ जाहागीरदार असतात तद्वत सांप्रतचे चिफांचे कायममुकाम रहातील आणि या घराण्याचे मुळचे ऐश्वर्याची छाया सुद्धां राहाणार नाहीं ही मोठे दुर्दैवाची व दुःखदायक गोष्ट होईल. याकरितां सर्वशक्तीमान परमेश्वरापाशीं आमची अंतःकरण पूर्वक अशी प्रार्थना आहे कीं या घराण्याचे सांप्रतचे चीफ रघुनाथरावअंण्णासाहेब यांचे आयुष्याचीं पुरीं शत वर्षें भरत तों पर्यंत याचें सर्वप्रकारें रक्षण करावें. असें झालें असतां, किमानपक्ष आमचे, विशेषेंकरून सांप्रतचे पिढीचे डोळ्यां देखत तरी या घराण्याचें सांप्रतचें ऐश्वर्य कायम राहील. ईश्वर करो आणि असें होवो म्हणजे सर्व झालें !

---

* हें उत्पन्न सरासरी मुळच्या सरंजामाच्या बत्तीसाव्या अंशाबरोबर आहे.

परिशिष्ट (क)

सन १७८३ इसवी सालीं माहादजी शिंदे यांनीं दिल्लीचे बादशाहा यांजकडून पेशवे माधवरावनारायण यांस पत्र आणिलें त्यांत पेशवे यांस खिताब लिहिला होता तो येणें प्रमाणें:—

अमारत् व अयालत् मर्तबत् हषमत् व षौकत् मंजिलत् जुबदय रफी उस् षान दौलत्ख्वाह उमदयखैर अंदषान बिलो इष्तिवाह कसीरुलइक्तिदार अकीदत् दिसार सइफे मस्लुले मैदान षुजाअत उमदे मसकुले मिजमारे जलादत मदार असनाफ् अवताफ् मोहोब्बत् अन्वाये अलताफ् मवरदे इनायत जिल्ले मष्मूल अवातिफ जमील व-किलेमुत्लक आमीर—उल—उमरा मुखतार—उल्—मुमालिक् मदार उल-मोहाम सलतनत् उमदय आराकिन खिलाफत् यार वफादार सिदह इख्लास सआदतमंद ब जानपयवंद फरजंदे खास-उल्-खास मुरव्वज माहाराजाधिराज पंडितपरधान सवाईमाधवराव नारायण बाहादूर फिद्वीय षाहआलम् बादषाहे गाजी.

सदर्हूचा मराठींत तरजमा.

मानपात्रता व संपत्ती यांचे अधिकारी; सेना व संपत्ती यांचें स्थान; मित्रतेचे चिन्हानें चिन्हितांतील केवळसार; राज्याभिष्ट चिंतक; निःसंशयपणें कल्याण इच्छकांतील अतिउत्तम; विश्वास वृद्धिकारक; भरवशाचेंचिन्हआहेज्यांस; रणभूमींतील केवळ नग्न तलवार; रणकंदनांतील माहाशूरत्वाचें केवळ तीक्ष्णधारेचा भालाच; माहाश्रेष्ट; परमविश्वासू; स्नेहभावाचें सुलक्षणाचा आसमंतात् भाग; नानाप्रकारचे कृपापात्र; सर्व कृपा उतरण्याचें स्थान; कृपेचे छायेनें वेष्टित; अतिसर्वोत्तम.

स्वतंत्र कामचालविणारे; सर्वअमिरांचेअमीर; (सर्व बडेलोकांत प्रमुख) सर्व देशाचा स्वसत्तात्मकपणें कार-

भारचालविणारे, दौलतिचे सर्व कामांचा भरंवसा आहे ज्यांजवर, राज्याधाराचे केवळ स्तंभच, अशा सर्व कारभारी मंडळीतील अति सर्वोत्तम; स्नेहभाव सिद्धीस नेणारे सुमित्र; सेनापती सुदैव-वान; व जिवास जीव देणोर; सरकारचे केवळ सुनिश्चित पुत्रच; असे जे माहाराजधिराज सवाईमाधवराव पंडीत प्रधान बाहादूर हे षाहआलम बादषाहा महान्वीर याचे ताबेदार.

या खिताबाशिवाय पेशवे माधवराव यांस खिल्लत (पोषाक) आली त्यांतील पार्च्ये (वस्त्रें) येणेंप्रमाणेंः—

१ दस्तार. (पागोटें)	१ जामा. (पायजमा)
१ निमास्तिन(अर्ध्या अस्तिण्यांची बंडी.)	१ चारकुबा.
१ चीरां.	१ वाकबंद.
१ कंबरबंद. (कंबरपटका)	१ दुमटा.
१ दुशाला. (शालजोडी.)	१ झगा.

हात्यारें वगैरे.

१ षमसेर. (तरवार)	१ मोर्च्येल जोडी.
१ ढाल.	१ हत्ती.
१ कलमदान.	१ घोडा.
१ शिक्केदउत.	१ नालकी.
	१ पालखी.

जवाहीर दागिने.

१ मोत्यांचीमाळ पदकसुद्धां.	१ शिरपेंच.
	१ कलगी.

माहादजी शिंदे यांस खिताब मिळालातो;—राजे माहादजी शिंदे, मदार—उल—मोहाम (सर्व कामात भरंवशाचे.)

शिवाय, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडा, माहीमरातब, नालकी आणि पालखी. येणेंप्रमाणें त्यांस मिळालें.

वरलिहिलेली बादशाही देहेनगी पेशवे यांनीं स्विकारूंनये असें कित्येक मुत्सद्दी मंडळींचें मत होतें; परंतु सातारचें माहाराज (ज्यांस रामराजे असें लोक म्हणत होते) त्यांची परवानगी आणवून नंतर पेशवे यांनीं दरबार करून त्यांत ती दरोबस्त देहेनगी मोठ्या समारंभानें स्विकारिली.

नंतर माहादजी शिंदे यांनीं आपल्यास बादशाहाकडून मिळालेली देहेनगी पेशवे यांचे आज्ञेवरून स्विकारिली. नंतर ते पालखींत बसून आपले छावणीस गेले.

परिशिष्ठ (ख)

विंचूर संस्थानचें एकंदर वार्षीक उत्पन्न वगैरे दाखविणारा तखता.

गांवांचें नांव.	रकबा जमीन.	कमाल आकार.	तनखा बेरीज.	वसूली आकार.
	बिघे. पांड. काठ्या.	रुपये. आणे. पै.	रु. आ. पै.	रु. आ. पै.
इनामीगांव (नाशिक जिल्ह्यांत.)				
कसबें विंचूर	१३१९०-५	१४२७४-५-६	८००१	७४७६-४-६
मौजे सायखेडें	३१९४-२-३	२९१९-१२-११	२०४७-८	२५०३-२-३
	१६३८४-७-३	१७१९४-२-५	१००४८-८	९९८९-६-९
सरंजामी गांव. (नाशिक जिल्ह्यांत.)				
मौजे टाकळी.	६००१५७-२॥	५८०७-५-३	४०१२-६	३६७३-१-१०
कोटमगांव नजीक.	३५१५-१९-१०	२८८२-३-१	१९९५	१९६२-१२-४
निंबगांव वांकडा.	२४०९	२२२६	९८७-९	१३७२-१०-२
पींपळगांव नजीक.	१४६४-५-१८	१०५८	७०७-८-६	९७२-२

	बि. पा. का.	रु. आ. पै.	रु. आ. पै.	रु. आ. पैं.
मनमाड.	५६९२/१/६॥	३६८९/११/९	२३३८/१३	४२१९/१
दहीगांव.	१५१९/८	७३२/७	४१८/१२/९	५७१
कोंकण खेडें	२०४०	१०७७/१२	८५८/१०	८००/५
दरेगांव.	१३५५	८५७/८	७५९/४	८३८/५/३
मेसनखेडें.	११५२/१५	३७०/१२	२९१/१/३	२३३/१
बाद.	७१०	३४८	३०७//६	२९८/६/६
डोणगांव.	९२८	४०१/१२/५	३५४/१/६	३६६/११/९
डोंगरगांव.	९६०	४३९	३३४/८/६	४४२/६
गंगावें.	९२०/५	९८६	७१४/८	७१३/८
धोडंबें.	३३६०	२२९६/२	१८००	१७१५/१/८
पाटोदें.	४८००	४८३६	२१०५/११/६	२२१५/४/११
वळदगांव.	१५७०	१२०२/१२/९	७३८/११/६	१०००/१
पीपळगांवलेप.	३११५	३३६८	१९२३/३	२७१३/१२/१०
आडगांवरेपाळ.	२४५९	२३०५	७४१/६/६	१६०८/७/७
सातारें.	१२००	११३४	६६२/१०/६	८९९/१२
बाभुळगांव बुजुर्ग.	१९२०	९६९	५७४/१५/३	८३२
बाभुळगांव खुर्द.	१८००	१३१६/२	६८१/१३	११५५/११

	बि. पा. का.	रु. आ. पै.	रु. आ. पै.	रु. आ. पै.
पारेगांव.	१८००	१०३५॰१२	९८४॰९	७०७॰॰९
कोटमगांव खुर्द.	१२००	११०५॰१२	७६९॰९॰६	९०१॰६
भायखेडें.	६००	३६७॰८	३२७॰११॰६	१५८॰२
येवलें.	१४४०	१२८८	६२३॰८	११७०॰३॰९
जउळकें.	१४४०	१३५८॰४	११३७॰११	११४९
धुळगांव.	३६००	२९३९॰४	१८३८॰१२॰९	१२९६॰९॰१
बदापूर.	१६५३॰१	१५५६	८५३॰५॰६	१४०२॰८
सोमठाणें देश.	२६७७	२०३९	१८५४॰१३॰९	१८२१
आंबेगांव.	१३८६॰११	८६६॰१०॰६	५३८॰१२॰६	६८९॰५॰६
नेउरगांव.	३६००	३४४३	२३७२॰१	२६६०॰१२॰४
देशमाने बुजुर्ग.	३४७२॰१५	४०१९॰३॰९	२५९३॰४	३१५२॰१४॰३
निंबगांक मढ.	५०९७	४८२५	३३३७॰४	३४७९॰३॰११
भारम.	३०९०	११०४	१०४०॰१०	८४७॰१०॰५
न्याहारखेडें.	६३०	६३०	४२०॰११	२८०॰८
धनकवाडी.	७२०॰१०	३६६॰८	४०८॰१२॰६	१६२
कासारखेडें.	७१७	३४७	२०७॰३॰१	१५३॰२
मानोरी.	२१८१	२५११॰४	१९०८॰१०	२२१८॰१५॰६

	बि. पां. का.	रु. आ. पै.	रु. आ. पै.	रु. आ. पै.
जळगांव बुजुर्ग.	३६००	१०१३-२	७१०-१-६	६१२-१२
सोयगांव.	१२००	६७५-१२	३७०-१५	२९६-८-९
येकवई.	९६२	५१३-८	१९२-५-९	५०६-५-१०
खादगांव.	१२००	८१८-७	५७१-६	६३२-१२-३
दहीवड.	५६००	४७५८-२	२४२८-४	२३६६-११-९
(नगर जिल्ह्यांत.)				
धामोरी.	५३४४	६०९९-११	३९५६-३-६	४२२८-१५-६
लाटेगांव.	१८००	१७४७	८३०	११५६
चांदगव्हाण.	१६८०	१३१७	१०९६-४-६	६५४-६-१०
(पुणें जिल्ह्यांत.)				
रांसें.	२२२४	१९३५-८	७४३-४	११४२-१-३
मांडकी.	१५६८-१५	३२२६-१०-६	१२६९-३	५१६९
	१०९८७५-१३-१७	९०२१०-७	५५३३७-१-६	६५२९९-१३-७
एकंदर........	१२६२६०-१	१०७४०४-९-५	६५३८५-९-६	७५२८९-४-४

				रु. आ. पै.
कंपेनसेशन.	०	०	०	२३७५८।०
स्टांपविक्री.	०	०	०	६४९७८।४
इनामी जमिनी.	०	०	०	४००
देशमुखी.	०	०	०	२४८३८४८।०
पाटीलक्या व कुळकर्णे यांबद्दल.	०	०	०	३२७।८४८४
दिवाणी भत्ता.	०	०	०	१४०।८५८६
किरकोळ.	०	०	०	४६६८८२८।

एकंदर रुपये......९६३८६८।३८।

* सन १८८१ इसवी सालीं हिंदुस्थानांत खानेसुमारी झाली त्याप्रमाणें विंचूर संस्थानची लोकसंख्या येणें प्रमाणें:—

नाशिक जिल्ह्यांतील.

१	कसबे विंचूर ...	४८९२
२	मौजे सायखेडें	२०१०
३	मौजे टाकळी ...	१०९०
४	कोमटगांव नजीक ...	७७०
५	निंबगांव वांकडा	१५५
६	पिंपळगांव नजीक ...	२६५
७	मनमाड	३७८६
८	दहीगांव	२७५
९	कोकणखेडें... ...	२३६
१०	दरेगांव	५६६
११	मेसनखेडें... ...	७९
१२	वाद	७६
१३	डोणगांव	१०१
१४	डोंगरगांव...	२०९
१५	गंगावें	३१४
१६	धोंडबें	१४०९
१७	पाटोदें	७९२
१८	वळदगांव	९८
१९	पिंपळगांवलेप ...	२९१
२०	आडगांवरेपाळ	३२५
२१	सातारें	२०३
२२	बाभुळगांव बुजुर्ग ...	२२२
२३	बाभुळगांव खुर्द	९६
२४	पारेगांव	१८१
३५	कोटमगांवखुर्द	४३५
२६	भायखेडें	४०
२७	जउळकें	३२४
२८	धुळगांव	७८४
२९	बदापूर	१२९
३०	सोमठाणें देश ...	८८४
३१	आंबेगांव	२१५
३२	नेउरगांव	४६१
३३	देशमाने बुजुर्ग ...	६९२
३४	निंबगांवमढ ...	४५६
३५	भारम	४९८
३६	न्याहारखेडें ...	१०
३७	धमकवाडी ...	४२
३८	कासारखेडें ...	३८
३९	मानोरी	२६०
४०	जळगांवबुजुर्ग	५००
४१	सायगांव	१५५
४२	येकवई	१२०
४३	खादगांव	२९८
४४	दहीवड	१२०४

नाशिक जिल्ह्यांतील पहिल्या स्तंभाची बेरीज: १८४००

नगर जिल्ह्यांतील.

४५	धामोरी	९७७
४६	नाटेगांव	३१९
४७	चांदगव्हाण... ...	५२

दुसऱ्या स्तंभाची बेरीज: ८८९३

एकूण.एकंदर.....२७२९३.

४८	येवले	....०
४९	रासें	....०
५०	मांडकी	....०

* विंचूर संस्थानचें इनामी व सरंजामी मिळून ५० गांवांपैकीं फक्त ४७ गांवांची खानेसुमारी विंचूरकर यांनीं केली, सबब ४७ गांवांचीच लोकसंख्या येथें लिहिलीअसून बाकी ३ गांवांसमूर पुज्यें दाखल केलीं आहेत. या ३ गांवांचे लोकसंख्येचे आंकडे सरकारचे खानेसुमारिवरील कामगार यांचे दफ्तरांत मिळतील.

दरबारी शब्दांचा कोश.

दरबारी शब्द.		त्याचा मराठी अर्थ.
अ		
अखबार.	....	....खबरा-री. वर्तमानें.
अखबारनवीस.	....	....वर्तमानेंलिहूनकळविण्याकरितां परस्थळीं ठेविलेला मनुष्य.
अंजाम	....	....परिणाम.
अजींसौब.	....	....हिकडून.
अफ्सोस.	....	....दुःख. खेद.
अलिनबाब.	....	....मोठ्यादर्ज्याचा, पदवीचा, नबाब.
अलिषान.	....	....मोठ्याछानीचा. श्रीमान.
आ		
आतषबाजी.	....	....दारूकाम. जसे, नळे, हवया, बाण, तारे, झाडें, वगैरे.
आयंदां	....	....पुढें. पुढीलकाळीं.
आंसाहेब आंमेहेरबान	....	....आपण.
आंके *	....	....अणखीं.
आलाहिदा	....	....पृथक. निराळें-ळा-ळी.
इ		
इजलास	....	....बैठक. बसणें.
इंजानिब	....	....मीं-आह्मी.
इतराजी खफ्गी	....	....अवकृपा.
इतल्लाकरणें.	....	....वरिष्टास कळविणें.

* कारकूनलोक "आंके" शद्धाचे ऐवजीं चुकून "अंकीं" असा शब्द लिहितात.

इतलाक्फौज. ....प्रसंगोपात नवीन नौकरीस ठेविलेली फौज.

इंतिकाल. ....देहांत, मरण.

इन्सान. ....मनुष्य, माणूस.

इबूलाग्किया. ....प्रविष्ट केला, पोंहोंचविला.

इस्म. ....नाव. जण.

इमानदारी. ....इमानीपणा.

उम्दा. ....उत्तम. बेष.

उम्देतुल्मुल्क. ....दौलतीचाधीरा, खांब.

क

कतल करणें. ....तरवारीनें किंवा इतर हात्यारानें तोडणें.

कदीम्. ....पुरातन. जुना.

कमाल. ....अतिशय मोठा.

करम् ....मेहबानगी, देहेनगी.

करम्फर्माय दोस्तां... ....मित्रांवरकृपाकरणारा, मित्रांस देहेनगी देणारा.

कलम. ....लेखणी.

कलम जारी करणें.... ....उमेदवार शिपायांचीं नांवें नौकरांचे पटांत लिहिणें.

कलमी करणें. ....लिहिणें, लिहून कळाविणें.

कही करणें ....लूट करणें. घोड्यांस चंदी, वैरण वगैरे सामान मिळविण्यास्तव मुलकांत स्वारांचें फिरणें.

किताबत् * ....लेख.

कूच. ....चालणें.

कूच करणें. ....लष्कर, फौज;बरोबर घेऊन जाणें.

कैसरे हिंद. ....हिंदुस्थानचा बादशाहा किंवा हिंदुस्थानची बादशाहीण.

---

* दरबारी पत्राचे शेवटीं हे विनंतीचे ऐवजी हा शब्द लिहिला जातो.

ख

खत	....	....पत्र.
खानूदानी	....	....घराणें. कूळ.
खिताब्	....	....किताब.
खुदावंद, खुदायगान	....	....साहेब, माहाराज, धनीं.
खुराकी—पोषाकी	....	....अन्नवस्त्र.
खुषामद	....	....आर्जव, स्तुती.
खैरख्वाह	....	....शुभचिंतक.
खैरख्वाही	....	....शुभचिंतन.
खैरसला	....	....सुखरुपता, स्वस्तीक्षेम.
खैराफियत्, खैरीयत्	....	....कूशल.

ग

गनीम	....	....शत्रू.
गरीबूपरवर	....	....गरिबांचें पोषणकरणारा.

ज

जवांमर्द	....	....पराक्रमी.
जाफत	....	....मेजवानीं.
जुर्रत, जुरियत	....	....हिम्मत, मगदूर, औसान.
जियादा	....	....अधीक.
जनाब	....	....माहाराज.
जनाबेआलि	....	....माहाराजाधिराज.

त

तख्तं	....	....सिंहासन.
तख्तताऊस	....	... मोराचे सिंहासन.
तख्तनषीन	....	....सिंहासनारूढ.
तबियत.	....	....प्रकृती.

तरजमा ....भाषांतर

तारीफ. ....प्रशंसा.

तैनात. ....वेतन, मुशाहिरा, पगार.

द

दफ्तर. ....दप्तर.

दफ्तरदार. ....दप्तरदार.

दरींविला. ....सांप्रत.

दिगर. ....इतर.

दिगरमजमून. ....इतर मजकूर.

दामअष्फाकहु. ....नेहेमीं तुमची कृपाराहो.

दामएकबालहु. ....नेहेमीं तुमचा प्रताप राहो.

दाम मोहोब्बतहु. ....नेहेमीं तुमचा लोभराहो.

दर. ....आंत.

दरइजलास. ....बैठकींत.

न

नबाब. ....मुसलमान मांडलीक राजा, किंवा रजवाडा, किंवा सरदार, किंवा बडा लोक.

नमकहराम. ....आपले अंन्नदात्यावर उठणारा किंवा त्याचें नुकसान करणारा.

नमकहलाल. ....आपले अंन्नदात्याचे हीत करणारा. त्याचे उपकार मानून त्याजबरोबर विश्वासानें वागणारा.

निहायत. ....मोठा.

प

परवरिष. ....पोषण, परामृष.

पसंद. ....पसंत.

पीलखाना. ....हत्ती बांधण्याचें, राहाण्याचें ठिकाण.

प्यार. ममता, लाड.

फ

फराजिंद.	....	....औरस पुत्र.
फारसी.	....	....पार्शी.
फारसनवीस. फारसीखां.	....	....पार्शी जाणणारा. मुनशी.
फिदवी.	....	....शेवक, नौकर, ताबेदार.
फैजबक्ष.	....	....बक्षीस करणारा.
फैजरसान.	....	....फायदा करून देणारा.

ब

बदमाष.	....	....गैरचालीचा, दुष्कर्मी.
बंदिगान्.	....	....साहेब. माहारांज. धनी.
बक्षी.	....	....सेनापती.
बक्षीगरी.	....	....सेनापतीचें काम.
बाद.	....	....नंतर.
बादज बरसात.	....	....पावसाळ्या नंतर.
बादषाहा.	....	....पादशाहा.
बाहादर. बाहादूर.	....	....पराक्रमी.
बाहादरी. बाहादूरी.	....	....पराक्रम.
बाहाल करणे.	....	....दिलेले परत न घेणें किंवा परत देणें.
बेआदबी.	....	....अमर्यादा.
बेबंदी.	....	....अव्यवस्था, बेवंदोबस्त, बलबलपूरी.
बेमरामत.	....	....डागडूजी न झालेला–ली.
बेवकूफ.	....	....मूर्ख.

म

मर्दुमी	....	....पुरुषार्थ.
मसूजीद	....	....मशीद.
मालीक	....	....मालक.

मालूम होय ....कळावें.
मुसाफिर ....मुशाफर.
मुबारकबादी देणें ....सहानंद कळविणें.
मुलुकगीरी करणें ....मुलुक सरकरण्यास्तव किंवा खंडणी वसूलकरण्यास्तव फौजेनिशीं फिरणें.
मुलक ....मुलूख.
मुष्फक ....कृपावंत.
मुस्तताब् ....थोर.
मोर्चा ....रुंद व खोल खंदक खोदून त्या खंदकाचे मागील बाजूस रुंदीकडे पांच साहा कणगी जवळजवळ उभ्या करितात व त्याचप्रमाणें त्या मोर्चाची जितकी लांबी असेल तेथपरियंत अणखीं कणगी उभ्या करितात आणि त्या खंदकांतील माती त्या सर्व कणगींत भरितात. मग त्या कणगींचे आसपासचे रिंकामे जाग्यांत दगड भरून वरून माती बसवितात, आणि ती माती ठोकून सपाट सडक झाली ह्मणजे तीचे पुढले बाजूस खंदक राहातो व मागले बाजूस खालीं उतरण्यास तिन चार पाहिऱ्या करितात. शिपाई त्या पाहिऱ्यानी खालीं उतरून बंदुक भरीतो, आणि ती सडक छाती इतकी उंच पुंढे राही तोंवर तो पाहिऱ्या चढतो आणि तेंथें बंदुकेची शिस्त धरून ती खंदकापलिकडे शत्रू-

वर सोडितो. त्यासडकेचे एकंदर लांबी मध्यें कांहीं अंतरांवर बुरूज बांधून त्यांत तोफा लावून शत्रूवर सोडितात. त्या एकंदर लढाऊ कामास "मोर्चा" असें ह्मणतात.

मोर्चेबंदी ....असे मोर्चे पुष्कळ बांधून किल्यावर तोफांचा मार करितात त्या मोर्चांस मोर्चेबंदी असें ह्मणतात.

मोहीम ....काम. लढाई. स्वारी.

मोहोब्बत ....लोभ.

मौलाअलकाब् ....मोठ्या दर्जाचा. मोठ्या मरातबाचा.

मौसूफ ....वरलिहिलेला. मशारनिल्हे.

मलिकासाआजमा ....माहाराजाची विवाहित कंन्या. थोर मालकिण. धनीन.

र

रुसल ओ रसायल.... ....पत्रव्यवहार.

रैयत परवरिष् ....प्रजापालन.

रोषनी } रोषनाई } ....बहुत दिवे लाविल्याने प्रकाश पडतो त्यास रोषनी किंवा रोषनाई असें ह्मणतात.

ल

लवाजमा ....इतमाम. हत्ती, घोडे, म्याने, पालख्या, शिपाई, प्यादे, वगैरे खटला.

व

वाफस ....परत. माघारें-रा,-री.

वारिस् ....वारस.

ष

षादमानी ....खुषी. संतोष. आनंद

षखस ....मनुष्य.

षाहइनषाह ....माहाराजाधिराज.

षिताबी ....शिताफी.

षुतरखाना उष्टरखाना. उंटखाना.

षेखी ....शेखी. अहंपणा.

स

सफर. ....प्रवास,

सरकरणें ....जिंकून घेणें. काबीज करणें.

सलमहु ....तुह्मी सुखरूप राहा.

सलामत कूचा ....एका मोर्च्यांतून दुसऱ्या मोर्च्यास जाण्यास्तव किंवा मोर्च्यांत जंगी सामान ह्मणजे दारूगोळा वगैरे पोहोंचविण्यास्तव जमीन खोदून खोल नागमोडी आकाराची वाट करितात ती.

सलामबादज सलाम ....सलामामागून सलाम. पुष्कळ सलाम.

सिफ़ारिष् ....शिपारस.

ह

हक्क होणे ....मरणें.

हकूताह्ला ....परब्रह्म. परमेश्वर.

हयात ....आयुष्य.

हरवक्त ....दरवेळेस.

हाजिर ....हजर.

हुजूर ....समूर. अधिकाऱ्याचा दरबार.

हजरत ....माहाराज. साहेब. धनी.